नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २६१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ५०३ कंपन्यांनी कामकाज बंद केले : राज ठाकरे

पुणे : (स. गांवकरी)

भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत तब्बल 7.8 टक्के इतका विकास दर नोंदवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी देशवासियांचे आभार मानले होते. पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत देशवासियांशी संवाद साधताना महत्त्वाचे आवाहन केले होते. देशाचा आर्थिक विकासदर चांगला असून ही गती कायम ठेवायची असेल तर आपल्याला स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारत या दोन धोरणांचा अधिकाअधिक अवलंब करावा लागेल, त्यासाठी परदेशातील प्रवास टाळा, विदेशात जाऊन लग्नसोहळे करणे टाळा आणि गरज नसेल तर सोने खरेदी करू नका, असा सल्ला त्यांनी दिला होता. आता पंतप्रधान मोदींच्या याच आवाहनावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.



राज ठाकरे म्हणाले की, “दोन दिवसांपूर्वी नरेंद्र मोदींनी परदेशात असताना सांगितले की, कोणीही परदेशात जाऊ नका. मला ही गोष्टच फार आवडली की, परदेशातून भारतीयांना सांगायचे परदेशात जाऊ नका. सोने खरेदी करू नका आणि भारतात सांगितले जात आहे की, आमचा देशाचा जीडीपी 7.8 टक्के आहे. जो अमेरिका आणि चीनपेक्षा देखील जास्त आहे. मग परदेशात का जायचे नाही? मग सोने का खरेदी करायचे नाही? घरामध्ये जेव्हा चणचण असते, तेव्हाच काटकसर सुरू होते ना. 7.8 टक्के आपला जीडीपी ग्रोथ आहे, मग या देशातल्या लोकांनी परदेशात का फिरायला जायचे नाही? त्यांनी का सोने खरेदी करायचे नाही? याचे कारण संपूर्ण देशाची आर्थिक परिस्थिती ही ढासळलेली आहे. पुढे पुढे आर्थिकदृष्ट्या काय काय गोष्टी घडतील. आता फक्त नीटच्या प्रकरणात जेन झी तरुण रस्त्यावरत आलेत, उद्या अख्खा देश रस्त्यावरती येईल. आपण गांभीर्याने विचार करण्याची गोष्ट आहे की, आपण नक्की चाललोय कुठे आणि आपण काय करतोय?,” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे पुढे म्हणाले की, “तुम्हाला या सगळ्या गोष्टीत फक्त गुंतवून ठेवायचे आहे. जातीच्या वादात, धर्माच्या वादात गुंतवून ठेवायचे, तुम्ही या वादात गुंतून राहिलेत की बाकीचे प्रश्न विचारायला तुम्ही मोकळे नसतात. देशात सर्वाधिक बेरोजगारीचे प्रमाण आज वाढलेले आहे. इतकी भयानक परिस्थिती आता देशामध्ये आहे. हे आता सरकारचे किंवा भारतीय जनता पक्षाचे आंधळेपणाने फॉलो करणारे लोक आहेत, त्यांच्यावर जाऊ नका. कारण ते आता बोलत आहे ते स्वतःची समजूत काढत आहेत. ते बाकी दुसरं काही करत नाही. त्यांना वस्तुस्थिती आणि परिस्थिती माहितीच नाही. त्यांना जे वरतून व्हॉट्सअॅप पाठवले जातात, ते वाचतात, पाठ करतात आणि तुमच्याशी बोलायला लागतात,” असे त्यांनी म्हटले. 2021 ते 26 मध्ये ज्या परदेशी कंपन्या भारतात आल्या, त्यातील 503 कंपन्यांनी कामकाज बंद केले आहे म्हणजे नोकऱ्या किती गेल्या याचा अंदाज बांधा.

## राज ठाकरेंच्या मताशी पुतण्या सहमत

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मनसेच्या पदाधिकारी मेळाव्यात आज केलेल्या वक्तव्याची राजकीय वर्तुळाच चांगलीच चर्चा होत आहे. कारण, एकीकडे गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळत असून दुसरीकडे गणेशोत्सवात डीजे वाजवण्यावरुन वाद समोर येत आहेत. त्यातच, गणेशोत्सव येत आहे, गणपतीच्या दिवसात दंगली घडवल्या जातील. केवळ महाराष्ट्रात नाही म्हणत मी, देशात दंगली घडवल्या जातील, जेणेकरून तुम्ही त्यात अडकले पाहिजे, तुमचं इतर गोष्टीकडं दुर्लक्ष झालं पाहिजे, असे वक्तव्य राज यांनी केले. आता, राज ठाकरेंच्या वक्तव्याशी पुतण्या आमदार आदित्य ठाकरेंनी सहमती दर्शवली आहे, तसेच उदाहरण देत भाजपला लक्ष्यही केलं. मुंबईच्या मुलुंड पूर्व परिसरामध्ये भाजप आमदार मिहीर कोटेचांविरोधात शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला असून आमदार मिहीर कोटेचा यांच्या राजीनाम्याची मागणी करत शिवसेना ठाकरे गटाकडून मुलुंडमध्ये स्वाक्षरी अभियान सुरू करण्यात आलं आहे. या स्वाक्षरी अभियानामध्ये युवासेना नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी सहभागी होत, मिहीर कोटेचांचा व्हिडिओ दाखवला. लाव रे तो व्हिडिओच्या माध्यमातून, कशाप्रकारे येथील मैदानं हडपण्याचा डाव असल्याचं आदित्य यांनी सांगितलं. तसेच, राज ठाकरेंनी केलेल्या वक्तव्याबाबत त्यांना प्रश्न विचारला असता, आदित्य यांनीही काकांच्या वक्तव्याचं समर्थन केलंय.

## थोडक्यात...

### मागण्यांवर सरकार चर्चेला तयार

पुणे (स. गांवकरी) : “स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारची भूमिका सकारात्मक असून, त्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. चर्चेतून प्रश्न सोडविण्याची सरकारची मानसिकता आहे. आंदोलनापेक्षा चर्चेतून मार्ग काढणे अधिक महत्त्वाचे आहे,” अशी भूमिका आमदार विक्रम पाचपुते यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केली. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. पाचपुते म्हणाले, ““एमपीएससी’ अध्यक्षांच्या कार्यकाळात गैरप्रकार झाल्याचे आरोप असले तरी ‘एमपीएससी’ ही एक स्वायत्त संस्था असून अध्यक्षांची नियुक्ती राज्यपाल करतात. त्यामुळे थेट राजीनामा घेण्याचा अधिकार सरकारला नाही. मात्र, चौकशीत जर कोणीही दोषी आढळले, तर त्यांची तात्काळ पदावरून हकालपट्टी केली जाईल.

### शेततळ्यात निर्घृण हत्या

वणी (नाशिक) (स. गांवकरी) : दिंडोरी तालुक्यातील लखमापूर येथे ७० वर्षीय वृद्ध महिलेची हात-पाय बांधून व तोंडाला लुगडे आवळून घराजवळच असलेल्या शेत तळ्यात फेकून निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंदाकिनी हरिभाऊ सोनवणे (वय ७०, रा. लखमापूर, ता. दिंडोरी) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे लखमापूर परिसरात खळबळ उडाली असून, हत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. लखमापूर शिवारात सोनवणे यांचे घर असून, घराच्या मागील बाजूस सुमारे दोनशे फूट अंतरावर असलेल्या शेततळ्यात शनिवारी (ता. ५) कुजलेला अवस्थेत मृतदेह आढळून आला.

# आळंदीत चैतन्यमय वातावरण

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेत बिट्टा यांचे गौरवोद्गार

आळंदी : (स. गांवकरी)

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीने पावन झालेल्या आळंदी नगरीत आल्यानंतर मला प्रसन्न वाटले. मंदिरातील अजानवृक्षाजवळ खूप मोठे चैतन्य आहे. एवढे मोठे चैतन्यमय समाधीस्थळ,आणि नामांकित ठिकाण असूनही अद्याप देशातील बहुतांश लोकांपर्यंत पोहोचले नाही, हे आश्चर्य म्हणावे लागेल. समाजातील सर्व स्तरांपर्यंत या संत महतीची माहिती पोहोचणे गरजेचे असल्याचे अखिल भारतीय आतंकवाद विरोधी मोर्चाचे अध्यक्ष, पंजाबस्थित मनिंदरजीतसिंग बिट्टा यांनी आज आळंदीत सांगितले. निमित्त होते संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे दर्शन आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या मंदिराचे दर्शन. अखिल भारतीय आतंकवाद विरोधी मोर्चाचे अध्यक्ष, भारतीय युवक काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि



पंजाबमधील बेअंतसिंग सरकारमध्ये मंत्री असलेले मनिंदरजीतसिंग बिट्टा हे दहशतमुक्त देश व्हावा यासाठी प्रार्थना करण्यासाठी आज आळंदीत आले होते. शनिवारी( ता. 5) सायंकाळी 6.15 वाजता नवी दिल्ली येथून विमानाने ते लोहगाव विमानतळाकडे निघाले. साडेसहा वाजता लोहगाव विमानतळावर पोहोचल्यानंतर मोटारीने शासकीय विश्रामगृहात मुक्काम केला. आज रविवारी(ता. 6) पहाटे पाच वाजता ते आळंदीत पोहोचले. आळंदीत पोहोचल्यानंतर पहाटे माऊलींच्या संजीवन समाधीसमोर आरतीप्रसंगी ते पंखा मंडपात बसले.

# पुण्यात ‘चार बेस, चार टॉप’ तरीही ध्वनिप्रदूषणाचा दणदणाट



पुणे : (स. गांवकरी)

डीजेच्या दणदणाटाला पुणेकरांचा वाढता विरोध, पुणे पोलिसांनी घालून दिलेली ‘चार बेस, चार टॉप’ची मर्यादा आणि काही मंडळांनी स्वतःहून डीजेमुक्त दहीहंडी साजरी करण्याचा घेतलेला निर्णय यामुळे यंदा शहराच्या मध्यवर्ती भागात ध्वनिप्रदूषणाचा स्तर काहीसा नियंत्रणात राहिल्याचे चित्र दिसून आले. मात्र, उपनगरांसह शहराच्या काही भागांत ‘चार बेस, चार टॉप’ची संख्या मर्यादित असली, तरी ध्वनिवर्धकांचा आवाज कर्णकर्कश पातळीवर पोहोचल्याचे दिसून आले.

## ११०० मंडळांच्या ध्वनीची नोंद, नियमभंगावर कारवाई

दहीहंडी उत्सव साजरा करणाऱ्या शहरातील १ हजार १०० मंडळांच्या साऊंड सिस्टीमच्या ध्वनीची तीव्रता पोलिसांकडून नोंदविण्यात आली आहे. या नोंदींच्या आधारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांची छाननी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. पुण्याच्या वैभवशाली गणेशोत्सवातील डीजेचा मुद्दा यंदा चांगलाच चर्चेत आला आहे. ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य पुणेकरांकडून डीजेच्या मोठ्या आवाजाला विरोध होत आहे. याच पार्श्वभूमीवर रविवारी डीजेविरोधात मोठा मोर्चाही काढण्यात आला. त्यामुळे यंदाच्या उत्सवात डीजे आणि ध्वनिवर्धकांच्या वापरावर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले होते.

दहीहंडी उत्सवापूर्वीच पुणे पोलिसांनी मंडळांसाठी ध्वनिवर्धक आणि डीजेच्या वापराबाबत नियमावली जाहीर केली होती. त्यानुसार मंडळांना चार बेस आणि चार टॉप एवढीच मर्यादा घालून देण्यात आली होती. त्याचबरोबर ध्वनिप्रदूषणाच्या निर्धारित मर्यादेचे पालन करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला होता. पोलिसांच्या सूचनांचा परिणाम शहराच्या मध्यवर्ती भागात तुलनेने अधिक दिसून आला. अनेक मंडळांनी ‘चार बेस, चार टॉप’ची मर्यादा पाळण्याबरोबरच ध्वनीची पातळी नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला. काही मंडळांनी तर डीजेचा वापर पूर्णपणे टाळून पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा केला. त्यामुळे मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्त्यांवर दरवर्षी जाणवणारा डीजेचा कर्णकर्कश आवाज यंदा काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसले.

मध्यवर्ती भागाच्या तुलनेत उपनगरांतील काही भागांत मात्र वेगळे चित्र दिसून आले. ‘चार बेस, चार टॉप’ची संख्या मर्यादित असतानाही ध्वनिवर्धकांचा आवाज मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आल्याचे दिसून आले.

दहीहंडी उत्सवादरम्यान पुणे पोलिसांनी शहरातील सुमारे १ हजार १०० मंडळांच्या आवाजाची नोंदी घेतले. यामध्ये संबंधित ठिकाणी ध्वनीची तीव्रता किती होती, याची नोंद करण्यात आली आहे. आता या नोंदींचे परीक्षण करून निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाज करणाऱ्या मंडळांची छाननी केली जाणार आहे. त्यानंतर नियमभंग करणाऱ्या मंडळांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यासह अन्य कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.






# थोडक्यात पण महत्वाचे



## ओतूर परिसरात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर परिसरात शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. परिसरातील विविध मंडळे, तरुणाई आणि गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडण्यासाठी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. थरावर थर रचून दहीहंडी फोडण्यात तरुण युवकांचा उत्साह पाहायला मिळाला. सकाळपासूनच परिसरातील मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दुपारच्या सुमारास दहीहंडी कार्यक्रमांना सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, डीजेच्या तालावर तरुणाईचा उत्साह आणि 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता. ओतूरची मानाची समजली जाणारी दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकाला ७७,७७७/- रुपये बक्षीस रक्कम म्हणून घोषित करण्यात आली होती. जय बजरंग दल संचलित 'राम राज्य गोविंदा पथक' तसेच स्व. गणेश तांबे संचलित 'शिवशंभो गोविंदा पथक' यांच्या संयुक्त विद्यमाने ही मानाची दहीहंडी फोडण्यात आली. गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत उंचावर बांधलेली दहीहंडी फोडण्याचा थरारक प्रयत्न केला. हंडी फोडण्यासाठी पथकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. दहीहंडी फुटताच उपस्थितांनी जल्लोष करत श्रीकृष्णाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून टाकला. महिला, लहान मुले तसेच नागरिकांनीही मोठ्या संख्येने उत्सवाचा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या ठिकाणी आयोजकांकडून आवश्यक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. ओतूरसह परिसरातील गावांमध्ये दिवसभर उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

आळेफाटा.ता,जुन्नर (स. गांवकरी) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रा.अनिल पडवळ यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचे स्मरण केले. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व आजचे एकदिवसीय शिक्षक प्राचार्य सिद्धी गाडगे, आरती नाईक, यश त्रिभुवन, पायल खाडे, पूजा भांबेरे, अविष्कार पोखरकर, अनुष्का डुकरे, क्रांती जगदाळे, प्रणव उनवणे, सुमित वाघ, महीनुर पठाण, मिसबा पटेल, प्रतीक डुकरे, रुबीना मनियार, आरती भोजने, ऋतिक राक्षे, साई सोनवणे, अनुष्का अंजुम पटेल हे विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## आदरणीय गुरूजनांचा सन्मान सोहळा



आळेफाटा (स. गांवकरी) : शिक्षक दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एक ओतूर मधील सर्व आदरणीय गुरूजनांचा सन्मान सोहळा शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आला. यानिमित्ताने सर्व सन्माननीय शिक्षकांना मराठी साहित्य विश्वातील सुप्रसिद्ध कादंबरी आणि सुंदर फुलझाडांची कुंडी भेट म्हणून देउन गौरविण्यात आले. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा परिषदेच्या सन्माननिय सदस्या सौ छायाताई तांबे, जुन्नर पंचायत समितीचे सन्माननिय सदस्य श्री प्रशांतजी डुंबरे आणि शालेय व्यवस्थापन समितीचे सन्माननिय माजी अध्यक्ष श्री जयवंतजी डुंबरे या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या मान्यवरांच्या हस्ते केंद्रप्रमुख सौ सुदेष्णा गाढवे मॅडम, मुख्याध्यापिका सौ सीमा डुंबरे मॅडम, सौ माधुरी शेटे मॅडम, सौ वनिता जाधव मॅडम, श्री सतिश नलावडे सर, सौ ज्योती शिरसाट मॅडम, सौ रुपाली गायकर मॅडम, श्रीमती योगिता बुट्टे मॅडम, सौ माणिक फापाळे मॅडम, सौ उषा भवारी मॅडम, सौ संगिता ढाकणे मॅडम या शिक्षकवृंदांचां यथोचित सत्कार करण्यात आला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री नितीन भास्कर डुंबरे तसेच समिती सदस्या सौ कविता संतोष डुंबरे, समिती सदस्य श्री नितीन विठ्ठल पानसरे यांनी तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सन्मानाचा शिक्षकी पेशा भूषवित असलेल्या समाजातील सर्वच शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

## मनमानी कारभाराविरोधात शिक्षक समन्वय समिती आक्रमक



अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट तालुका गटशिक्षणाधिकारी यांच्या कथित मनमानी कारभाराच्या विरोधात अक्कलकोट तालुका समन्वय समितीच्या वतीने तालुका सभापती व उपसभापती यांना निवेदन देण्यात आले होते. या प्रकरणाची पुढील दखल घेत आज जिल्हा समन्वय समितीचे सदस्य श्री. वीरभद्र यादवाड यांच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय श्री. कुशल जैन साहेब यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती व शिक्षकांच्या अडचणींबाबत सविस्तर माहिती सीईओ साहेबांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत "घडलेला वृत्तांत ऐकून घेतला असून, संबंधित प्रकरणाची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल," असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुशल जैन यांनी दिले.

# जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात!

### सभासदांचा सर्व विषयांना एकमुखी मंजुरी; सामाजिक कार्यासाठी प्रतिमा कुलकर्णी यांना २५ हजारांची मदत!

अकोले : (स. गांवकरी)



जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी महाराजा लॉन्स, अकोले येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेसाठी उपस्थित सभासद व मान्यवरांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अशोक भळगट यांनी केले. संस्थेचे संचालक श्री. धनंजय बुरके यांनी अध्यक्षीय सूचना मांडली, तर त्यास संचालक श्री. प्रविण वाकचौरे यांनी अनुमोदन दिले. संचालक श्री. चारुदत्त पापळ यांनी अहवाल सालात दिवंगत झालेल्या व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. आत्माराम रंधे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सभेत मांडण्यात आलेल्या सर्व विषयांना उपस्थित सभासदांनी एकमुखाने मंजुरी दिली. यावेळी एकल महिलांसाठी उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या सौ. प्रतिमा कुलकर्णी यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्यास हातभार म्हणून २५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. संस्थेच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल व व्यवसायवाढीसाठी शाखाधिकारी श्री. विकास सहाने यांचा, तसेच संस्थेतील स्वच्छता व साफसफाईची जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडल्याबद्दल शिपाई सौ. मनीषा कोल्हाळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. महेशराव नवले, श्री. गोपाळा वावळे सर, ॲड. श्री. के. बी. हांडे, श्री. संभाजीराव वाकचौरे, श्री. भाऊपाटील तळेकर, श्री. लालुशेठ दळवी, प्रा. श्री. बी. एम. महाले सर, श्री. आप्पासाहेब आवारी, व श्री. मधुकरराव नवले यांनी मनोगत व्यक्त केले. सभेचे अध्यक्ष तथा संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री. भाऊपाटील नवले यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या वाटचालीविषयी तसेच भविष्यातील ध्येयधोरणांविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. शाश्वत कर्ज आणि सुरक्षित गुंतवणूक हेच खरे यशाचे गमक आहे. आपला एकच व्यवसाय आहे—व्याज घेणे आणि व्याज देणे. यापलीकडे आपण कोणताही व्यवसाय करत नाही आणि करणारही नाही. जितक्या ठेवी मोठ्या, तितका बोजाही मोठा असतो. आपल्या संस्थेत फार गरीब माणसांच्या ठेवी आहेत. त्यामुळे सभासदांच्या पैशांची सुरक्षितता हीच आमची प्राथमिकता आहे." ते पुढे म्हणाले की, संस्थेच्या अहवालामध्ये कोणत्याही आकड्यांची मोडतोड केली जात नाही. संस्थेची खरी आर्थिक स्थिती सभासदांसमोर मांडली जाते. संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी थकबाकी पाच टक्क्यांच्या आत आणण्याचे लेखी आश्वासन दिले असल्याचे त्यांनी सांगितले. अकोले तालुक्यातील पतसंस्थांमध्ये सुमारे १३०० कोटी रुपयांच्या ठेवी असून ९०० कोटी रुपयांचे कर्जवाटप असल्याचेही त्यांनी नमूद केले. संस्थेच्या तीन शाखांसाठी स्वतःच्या मालकीच्या जागा घेण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. "दिवसा कुणीही पैसे देईल; मात्र आमच्याकडे रात्री पैसे मागायला आले तरी ते देण्याची क्षमता असावी, अशी संस्थेची आर्थिक स्थिती निर्माण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. पतसंस्थांच्या कामकाजाचा अभ्यास करण्यासाठी आपण जवळपास २५० पतसंस्थांना भेटी दिल्या असून, प्रत्येक संस्थेकडून काही ना काही चांगले शिकून त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचेही श्री. नवले यांनी सांगितले. यावेळी संस्थेच्या प्रगतीत सभासद, संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सभेसाठी आनंदराव वाकचौरे, प्रवीर मालुंजकर, गुलाबराव शेवाळे, सीताराम वाकचौरे, कैलासराव शेळके, माधवराव भोर, मधुकर बिबवे सर, डॉ. मनोज मोरे, बी. के. नाईकवाडी, राजेंद्र भुतडा, शरद चौधरी, नामदेवराव जाधव, बाळासाहेब गुळवे, चंद्रकांत शेवाळे, दिलीप तळेकर, शिवाजी पाटोळे, संजय देशमुख, रमेश जगताप, सुभाष वैद्य, कैलास भांगरे, ॲड. बी. जी. वैद्य, मंगलाताई हांडे, पुष्पलता वाकचौरे, संचालक रोहिदास जाधव, अक्षय नवले, रवींद्र घाटकर, डॉ. विष्णू बुळे, साहिल मेहता, तुषार सुरपूरिया, के. बी. दराडे, सौ. अनिता वाळुंज, सौ. सोनाली भोर यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन श्री. आत्माराम रंधे यांनी केले, तर संस्थेचे संचालक श्री. केशवराव बोडके यांनी उपस्थितांचे आभार मानले. सभेनंतर उपस्थित सभासद व मान्यवरांसाठी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

# दिंडी सोहळ्याचे आयोजन !

रावेर : (स. गांवकरी)



आद्यकवी महर्षी वाल्मिकी यांच्या अध्यात्मिक जयंतीनिमित्त आद्यकवी महर्षी वाल्मिकी अध्यात्मिक जयंती उत्सव समिती २०२६ तर्फे जिल्हास्तरीय दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी एकूण १० दिंडी पथकांची नोंदणी करण्यात येणार असून, उत्कृष्ट दिंडी पथकाला प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थानी श्री. शामराव बळीराम कोळी (मांगलवाडी) हे होते कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विविध गावांतील समाजबांधवांची उपस्थिती व सहकार्य लाभत आहे. या उपक्रमासाठी श्री. मनोहर कोळी (सुलवाडी), श्री. विनोद (शिवा भाई) कोळी (पुनखेडा), श्री. विनोद कोळी (खिर्डी), श्री. कैलास कोळी (कांडवेल), श्री. विजय कोळी (अजनाड), श्री. अतुल तायडे (मांगलवाडी), श्री. गोपाल कोळी (खीरवड), श्री. शुभम कोळी (निंबोल), श्री. सुभाष कोळी (सुनोदा), श्री. विक्की कोळी (चोरवड), श्री. शरद कोळी (आंदलवाडी), श्री. संतोष सपकाळे (सिंगत), श्री. दीपक तायडे (वाघोदा), श्री. किरण कोळी (अटवाडा), श्री. योगेश कोळी (अटवाडा), श्री. गणेश उन्हाळे (रावेर), श्री. योगेश्वर कोळी (तांदलवाडी), श्री. विजय मानेकर (रावेर), श्री. संतोष आप्पा (सिंगत), श्री. सागर खवले (तांदलवाडी) व श्री. सुपडू कोळी (थोरगव्हाण) यांच्यासह समाजबांधवांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

# नेवरे शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप!

- "सामाजिक उपक्रमांसोबत माणसे जोडण्याचे काम डॉ. सोन्या पाटील करीत आहेत" – डॉ. किशोर पाटील

वाशिंद : (स. गांवकरी)



शहापूर तालुक्यातील अघई केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेवरे येथे समाज कल्याण न्यास महाराष्ट्र राज्याच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. सोन्या काशिनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील, समाज कल्याण न्यासच्या शहापूर जिल्हा सचिव सौ. रंजिता दुपारे, समाजसेविका सौ. विद्याताई वेखंडे, ठाणे जिल्हा उपाध्यक्षा सौ. स्वाती कांबळे, मोहीली ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. निशिगंधा बोंबे, उद्योजक डॉ. श्री. भगवान हेंदर ठाकूर, माजी केंद्रप्रमुख श्री. सुनील बाबू पाटील, अघई केंद्रप्रमुख श्री. बाळकृष्ण धर्मा बिगर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश जाधव, शगीर शेख तसेच शिक्षक श्री. संजय पाराजी शेटे, श्री. अशोक बाबुलाल टकले, सौ. प्रिती पंडित पवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. किशोर पाटील यांनी समाज कल्याण न्यासच्या कार्याचे कौतुक केले. "समाज कल्याण न्यासच्या माध्यमातून डॉ. सोन्या पाटील हे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यासोबतच माणसे जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहेत. संस्थेचा विस्तार होऊन अधिकाधिक गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचावा, हा त्यामागील सकारात्मक उद्देश आहे," असे त्यांनी सांगितले. संस्थेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत केली जात असून शैक्षणिक साहित्य वाटप, रक्तदान व आरोग्य शिबिरे, मॅरेथॉन, भजन, निबंध व चित्रकला स्पर्धा, नेत्रचिकित्सा शिबिरे, मोफत चष्मे वाटप, भाऊबीज भेट तसेच साडी वाटप यांसारखे विविध सामाजिक उपक्रम महाराष्ट्राच्या विविध भागांत सातत्याने राबविले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी विद्याताई वेखंडे, स्वाती कांबळे, रंजिता दुपारे, निशिगंधा बोंबे व बाळकृष्ण बिगर यांनी समाज कल्याण न्यासच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून डॉ. सोन्या पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माजी केंद्रप्रमुख सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत पावसाचे गाणे सादर करून मनोरंजनातून प्रबोधन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेवरे, अघई केंद्रातील शिक्षकवर्ग, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करता येत असल्याचे समाधानच संस्थेच्या सामाजिक कार्याची खरी प्रेरणा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# फैजपूर-सावदा मार्गाच्या काँक्रीटीकरणाला सुरुवात; २७.९९ कोटींचा निधी मंजूर

### १४.२३० कि.मी. लांबीच्या समांतर मुख्य रस्त्याचे भूमिपूजन; वाहतूक अधिक सुरक्षित व गतिमान होणार

रावेर : (स. गांवकरी)



**कामाची प्रमुख माहिती**
मार्ग : फैजपूर शहर ते सावदा शहर
लांबी : 14.230 कि.मी.
टप्पा : कि.मी. 189.240 ते 204.500
काम : समांतर मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण
मंजूर निधी : ₹27.99 कोटी

बऱ्हाणपूर –अंकलेश्वर चारपदरी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांतर्गत फैजपूर शहर ते सावदा शहरादरम्यानच्या समांतर मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचे आज केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांचे हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यानंतर कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. या रस्त्यासाठी 27.99 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, एकूण 14.230 कि.मी. लांबीच्या मार्गाचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

फैजपूर शहर ते सावदा शहर या मार्गावरील कि.मी. 189.240 ते 204.500 या टप्प्यात हे काम होणार आहे. बुऱ्हानपूर-अंकलेश्वर चारपदरी राष्ट्रीय महामार्गाचे काम वेगाने सुरू असताना या महामार्गामुळे रावेर, यावल, फैजपूर आणि सावदा शहरांना बायपास मार्ग उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरांतर्गत विद्यमान रस्त्यांच्या विकासाबाबत निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी लक्षात घेऊन नागरिकांची दैनंदिन वाहतूक, व्यावसायिक व्यवहार आणि दळणवळण सुरळीत राहावे, यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प सुरू आहे. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या माध्यमातून फैजपूर-सावदा मार्गाच्या काँक्रीटीकरणासाठी पाठपुरावा करण्यात आला.

या रस्त्याच्या काँक्रीटीकरणामुळे मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि गतिमान होण्यास मदत होणार आहे. तसेच नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, परिसरातील दळणवळण व्यवस्था सुधारण्यासोबतच स्थानिक विकास आणि अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे. भूमिपूजन कार्यक्रमास विधानपरिषद सदस्य नंदकिशोर महाजन, लोक नगराध्यक्षा रेणुका पाटील, भाजपा गटनेत्या रंजना भारंबे, बेटी बचावच्या सारिका चव्हाण, मंडळ अध्यक्ष दुर्गादास पाटील यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सागरमल मोदी विद्यालयात दहीहंडी व शिक्षक दिन उत्साहात साजरा

नाशिक : (स. गांवकरी)



सागरमल मोदी विद्यालयात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव तसेच शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांनी सरस्वती पूजन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे, गीते, नृत्य, सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णव राधेच्या तसेच पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. मंजुषा झेंडे यांनी विद्यार्थ्यांना कृष्ण जन्माष्टमी चे महत्व सांगितले व क्रांती बोराटे यांनी श्रीकृष्णच्या जीवनावर आधारित गाणी सादर केले. अश्विनी पगार व मनीषा कापसे यांनी दहीहंडीचे चे पूजन केले तसेच गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून जल्लोष केला. किशोरी शुक्ल व भावना नागपुरे यांनी विद्यार्थ्यांना देण्यासाठी चविष्ट असा गोपालकाल्याचा प्रसाद तयार केला. कार्यक्रमादरम्यान सुरक्षिततेची सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख नीलिमा गायधनी, सुषमा यादव,रेखा जंत्रे, छाया जाधव, तेजश्री बुवा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना गोपालकाल्याचा प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तुमचे राजकारण चालू द्या, मी निघतो ! जिल्हा परिषद'अध्यक्ष संतापले

- अधिऱ्यांकडून डावलले जात असल्याने अध्यक्ष दीपक वैद्य संतापले
- स्थायी समितीत घडला नाट्यमय प्रकार

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत राजकारणाचा फटका आता थेट स्थायी समितीच्या सभेत उमटू लागला आहे. जिल्हा परिषदेच्या कामकाजाची आवश्यक माहिती आपल्यापासून दूर ठेवली जात असल्याच्या मुद्द्यावरून जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य गुरुवारी चांगलेच संतापले. अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावत, 'तुमचे अंतर्गत राजकारण चालू द्या, मी निघून जातो,' असे म्हणत त्यांनी सभेतून काढता पाय घेतला. मात्र सभापती संस्कृती सातपुते यांच्यासह दादासाहेब लवटे, बालाजी नरुटे, आदिनाथ देशमुख या सदस्यांनी त्यांची समजूत काढल्यानंतर अध्यक्ष पुन्हा बैठकीत सहभागी झाले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहात स्थायी समितीची सभा सुरू असताना हा प्रकार घडला. अध्यक्षांच्या नाराजीचे मुख्य कारण म्हणजे जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाबाबत आवश्यक माहिती त्यांच्यापर्यंत वेळेत पोहोचत नसल्याची बाब. अध्यक्षांना डावलून काही निर्णय व प्रशासकीय हालचाली होत असल्याचा मुद्दा सभेत उपस्थित झाला. त्यामुळे अध्यक्षांनी संबंधित प्रमुख अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली.

अध्यक्षपदाला राज्यमंत्री दर्जा असल्याने या पदाची प्रशासकीय आणि राजकीय प्रतिष्ठा राखली जाणे आवश्यक आहे. मात्र पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता निर्णय होत असतील तर त्याचा थेट परिणाम जिल्हा परिषदेच्या कामकाजावर होतो, अशी नाराजी यावेळी व्यक्त करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेपूर्वी अध्यक्षांना विविध विभागांच्या कामकाजाची इत्यंभूत माहिती उपलब्ध होणे अपेक्षित असते. मात्र जिल्हा परिषदेच्या एकूण ठेवी, पदोन्नतीच्या प्रलंबित फायली, शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्न, जनसुविधा तसेच इतर महत्त्वाच्या विषयांबाबत पुरेशी माहिती मिळत नसल्याने अध्यक्षांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. दरम्यान, स्थायी समितीच्या बैठकीत जनसुविधा, नागरी सुविधा आणि समाजकल्याण विभागातील विकासकामांबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. जनसुविधेची कामे केवळ जिल्हा परिषद स्तरावर न करता ग्रामपंचायत स्तरावरही करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे गावपातळीवर विकासकामांना अधिक वाव मिळणार असून सरपंचांना विकासकामे प्रस्तावित करण्याची संधी वाढणार आहे. तसेच जिल्हा परिषद सदस्यांनाही काहीसा दिलासा मिळाला आहे. विकासकामांची प्रक्रिया अधिक विकेंद्रित झाल्यास स्थानिक पातळीवरील गरजांनुसार कामे करण्यास गती मिळण्याची शक्यता आहे. अध्यक्षांनी भर बैठकीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्याने जिल्हा परिषदेतील अंतर्गत राजकारण पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. पदाधिकारी आणि प्रशासन यांच्यातील समन्वयाचा अभाव असेल तर त्याचा परिणाम विकासकामांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अध्यक्षांच्या नाराजीनंतर आता प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी कोणती भूमिका घेतली जाते.

> अध्यक्ष सभेतून बाहेर पडत असतानाच सभापती संस्कृती सातपुते, मी स्वतः, बालाजी नरुटे, आदिनाथ देशमुख आदींनी हस्तक्षेप केला. त्यांनी अध्यक्षांची समजूत काढत त्यांना पुन्हा सभागृहात आणले. त्यानंतर बैठक पुढे सुरू झाली.
> **- दादासाहेब लवटे, जिल्हा परिषद सदस्य**

# समाजकारणातील कार्यकुशल व्यक्तिमत्व

माजी सरपंच

# सौ.सुवर्णा गणपत ठाकरे

सरकार दरबारी अनेक विचारवंतांनी आपले मत मांडले होते की, जर सरकारमध्ये महिला कार्यरत झाल्या तर देशाची प्रगती होईल. आणि तेच जर गाव पातळीवर पोहोचले तर नक्कीच : प्रत्येक कुटुंब, गांव, शहर, तालुका, जिल्ह्याबरोबर देशाची प्रगती करु शकतील.

हा विचार अजुनही पूर्णपणे रुजू झालेला दिसत नाही. तसं असतं तर संसदेत महिलांच्या सीटबद्दल







चाललेला गदारोळ झाला नसता. परंतु सत्याकडे : पाठ फिरवू नये असं म्हणतात. ग्रुप ग्रामपंचायत नागांवच्या सरपंचपदी सौ. सुवर्णा ठाकरे ह्या निवडून आल्या आणि.. महिला सरपंच काय करु शकते हे त्यांनी दाखवून दिलं. त्याच्या वाढदिवसानिमित्त आणि त्यांच्या कार्यपूर्तीनिमित्त त्यांना आज सर्वत्र शुभेच्छा दिल्या जात आहेत. ह्या शुभेच्छा त्यांना नसुन त्यांच्या कार्याला आहेत. त्यांनी ग्रुप ग्रामपंचायतीत केलेल्या कामाची यादी फार मोठी आहे. अनेक ७ कामे पुर्ण केली असून कित्येक कामे मंजूर : झालेली आहेत, काही मंजूरीच्या प्रतीक्षेत आहेत. तीही लवकरच मंजूर होतील आणि एक आदर्श ग्राम पंचयात म्हणून नक्कीच नागांव ग्राम पंचायत ओळखली जाईल.

आजच्या महिला पुरुषांबरोबर अनेक ठिकाणी खाद्याला खांदा लावून काम करीत आहेत परंतु ग्रामीण स्तरावर अजूनही महिलांची परिस्थिती सुधारलेली नाही. अजूनही गावातील लोक महिलेस सरपंच म्हणून स्विकारत नाहीत. परंतु शासनाच्या नियमानुसार ज्यावेळेस महिलेसाठी राखीव असलेल्या जागेवर महिला सरपंचाची नियुक्ती होते त्याही वेळेस ती महिला स्वंयपूर्ण कार्यरत राहात नाही. ती कुणाच्या तरी सांगण्यावरुन ग्रामपंचायतीचे काम काज करत असते. परंतु नागावच्या बाबतीत असं झालं नाही. सौ. सुवर्णा ठाकरे ह्या समाज सेविका प्रथम होत्या नंतर त्या सरपंच झाल्या त्यामुळे समाजातील वेदनांची ओळख त्यांना अगोदर पासूनच होती. ज्यावेळेस त्यांच्या हातात सरपंच पद आले. आणि त्यांना संधी मिळाली लोकांच्या वेदनेंवर फुकर घालण्याची, त्यांनी ही संधी कोणत्याही परिस्थितीत दवंडली नाही. आणि त्यांनी त्याचा पुरेपूर उपयोग करुन ग्रुप ग्राम पंचायत नागाव मधील समस्या सोडविल्या. आणि आपली कारकिर्द यशस्वी केली. हे करत असताना त्यांना एक महिला म्हणून अनेक संकटाना जरी तोंड द्यावे लागले असले तरी त्यांचा. परिवार त्यांच्याबरोबर होता त्यामुळे त्या प्रत्येक संकटाला तोंड देवू शकल्या. याशिवाय त्या ठाण्यातील जगप्रसिद्ध समाजसमेवक डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या एन. के. टी. ट्रस्टच्या मुरबाड भागातल्या प्रतिनिधी आहेत. त्यामुळे जिथे जिथे पैशाची, काही सामानाची गरज होती त्या ठिकाणी डॉ. नानजीभाईंच्या मदतीने त्यांनी लोकांच्या समस्या क्षणात सोडविल्या. त्यांना डॉ. नानजीभाई यांचेही फार मोठे सहकार्य लाभलेला आहे. आताही त्यांचे सहकार्य लाभले आहे.

सौ. सुवर्णा ठाकरे या जरी ग्रुप ग्राम पंचायत नागांवच्या सरपंच असल्यातरी त्यांनी मुरबाड तालुक्यात अनेक ठिकाणी एन. के. टी. च्या माध्यमातून समस्यांना वाचा फोडून त्या यशस्वीरित्या सोडविल्या आहेत. तसे त्या मुरबाड बाहेरही अनेक ठिकाणी समाजसेवेच्या कार्यात सहभागी आहेत.

जोपर्यंत समाज सेवकास समाजकारणाची आवड लागत नाही तो पर्यंत तो खरा समाजसेवक नसतो. आणि ज्या समाजसेवेची आवड आहे तो जर राजकारणात आला तर तो राजकारणापेक्षा समाजकारण करुन समाजाला योग्य दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असतो. सौ. सुवर्णाताई ठाकरे यांच्याही बाबतीत असेच घडले आहे. त्या समाजसेवेत अगोदरपासूनच असल्यामुळे राजकारणात आल्यावर त्यांनी राजकारणात राजकारणापासून दूर राहून समाजकारणाला महत्व दिले. म्हणूनच आज त्या ग्रुप ग्राम पंचायत नागाव बरोबर आजूबाजूच्या परिसरातील अनेक लोकांच्या, गावाच्या समस्या सोडविण्यात यशस्वी झाल्या आहेत.

महिला राजकारणात आल्यावर प्रगती कशी होऊ शकते ? या प्रश्नाच उत्तर ज्यांना हव असेल त्यांनी ग्रुप ग्राम पंचायतच्या सरपंच सौ. सुवर्णा ठाकरे यांना येऊन भेटावे. आणि त्यांच कार्य पहावं आणि मग सांगाव की महिलांच्या सहभागामुळे प्रगती झाली आहे की नाही ? एवढेच नव्हे तर अनेक महिलांना ठाकरेताईंना भेटून त्यांनी नागाव ग्राम पंचायतीत कशा पद्धतीने काम केलं आहे ? त्यांना कोणत्या समस्या आल्या ? आणि त्या कशा सोडवाव्यात या संबंधी माहिती मिळवावी. जेणेकरुन त्यांनाही राजकारणात उतरुन आपल्या गावाची प्रगती करता येईल. तशा त्या स्वभावानेही प्रेमळ आहेत. मनमिळावू आहेत. भाऊक आहेत. तशा महिला भाऊक असतात परंतु ठाकरेताई नुसत्या भाऊक नाहीत तर त्या आपल्या भाऊकतेने सर्वांना आपलेसे करुन घेतात. त्यामुळे येणाऱ्या समस्यासुद्धा हसत हसत येतात आणि सौ ठाकरे यांच्यामुळे काही दिवसांत नाहीश्या होतात.

भारताचे प्रथम नागरिक, देशाचे राष्ट्रपती मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना सौ. सुवर्णाताई ठाकरे या सरपंच असतांना दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात भेटण्याचा योग आला. त्या मुरबाड तालुक्यातील राष्ट्रपतींना भेटणाऱ्या पहिल्या महिला असाव्यात. त्यांची



समाजसेवेची यादी फार मोठी आहे त्यामुळे त्या राष्ट्रपतीपर्यंत पोहोचू शकले.

ज्या पद्धतीने त्या सध्या समाज कारणात कार्य करत आहेत. सरपंच म्हणून गावाची प्रगती करीत आहेत ते पाहता त्यांच राजकारणातलं भविष्य उज्वल आहे. त्या पंचायत समितीकडे

**शब्दांकन : डॉ.विश्वासराव आरोटे**
प्रदेश सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ

लवकरच मार्गक्रमण करतील असा अंदाज आहे. आणि तसं झाल तर त्या नक्कीच यशस्वी होतील आणि त्या तिथेही आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटविल्याशिवाय राहणार नाहीत.

महिला आता चूल आणि मुलं यापुढं निघाली आहे. जरी पुढे गेलेली असली तरी ती आपल्या चुलीला आणि मुलीला विसरली नाही. सुवर्णाताई कित्येक वेळेस कामानिमित्त बाहेर जातात. अशावेळी त्या आपलं कुटुंबही सांभाळतात. त्यांनाही दोन मुलं आहेत दोन्ही मुलं, भरत दळवी सारखे शिक्षक सेवक त्यांना त्यांच्या कार्यात मदत करत असतात. त्यांचे पती गणपत ठाकरे हे एस. टी. त कामाला आहेत तरीही त्यांनी सुवर्णाताईंना योग्य साथ दिली आहे. मुळातच समाजकारणाची आवड असल्यामुळे, घरातून साथ मिळाल्यामुळे आणि डॉ. नानजीभाई सारखे मार्गदर्शक आणि सर्व प्रकारचे सहाय्य करणारे भेटल्यामुळे सौ. ठाकरेंना समाजसेवेत एकेक पाऊल समर्थपणे, यशस्वीपणे पुढे टाकायला वेळ लागला नाही. तसं त्यांच शिक्षणही फार झालेलं नाही. ते फक्त दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. परंतु त्यांच्यावर झालेले समाजकारणाचे संस्कार त्यांना सरपंच पदापर्यंत घेऊन गेले हे त्यामागचे गमक असावे.

त्यांच्या कार्याची दखल सुद्धा सर्व स्तरावर झालेली आहे. त्यांना अनेक मोठमोठ्या संस्थेचे पुरस्कार मिळालेले आहेत. पुरस्कारामुळे त्यांच्यावर जी वाढीव जबाबदारी पडत होती तीही त्या समर्थपणे पेलत आहेत, त्या सरपंच पदाशिवाय अनेक सामाजिक संस्थेवर पदाधिकारी म्हणून काम पहात आहेत. अनेक महिला बचत गटांची त्यांनी स्थापना केली आहे. महिलांना योग्य मार्गदर्शन देऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या सबल करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

एक महिलाच महिलांच्या समस्या जाणू शकते हे खरे आहे असं त्यांना वाटते म्हणूनच त्यांनी महिलांसाठी वेगवेगळ्या योजनेअंतर्गत गावात फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर सरकारशिवायही त्यांनी गावात मदत आणलेली आहे. त्याच एक उदाहरण म्हणजे डांगुर्ले गावात महिलांसाठी पिठाची चक्की ही सामाजिक संस्थेच्या मदतीने टाकली आहे. त्याचा उपयोग आज गावातील लोकांनाही होतो आणि महिलांनाही होतो.

याशिवाय स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाबाबतीत त्या अत्यंत जागरुक आहेत. त्यांना न्याय मिळावा यासाठी ते स्वतःच्या खिशातील पदरमोड करुन अनेक ठिकाणी जाऊन त्याचा पाठपुरावाकरुन पिडीतांना न्याय मिळवून दिला आहे. महिला परिवर्तनापासून ते पत्रकारितेपर्यंत अनेक संस्थेत ते सक्रीय सहभाग घेतात..

सुवर्णाताईंनी शिक्षणाचे महत्व ओळखून आपल्या परिसरातील शिक्षण संस्थांना अनेक पद्धतीने मदत कोली असतात. शासनाच्या नियमाने जी मदत मिळते ती तर त्यांना मिळवून देतातच परंतु शासनाशिवाय डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला सारख्या दानशूर व्यक्तींकडून आर्थिक, वेळ प्रसंगी वस्तुरुपाने मदत मिळवून त्या शैक्षणिक समस्या सोडवत असतात. गरिबांसाठी आज शिक्षण अत्यंत महाग झालेले आहे अशा परिस्थितीत गरिबांच्या पाठीशी उभं राहून- त्यांना शिक्षण मिळाव यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत असतात. ज्या गावात शिकले त्या गावातील शाळा सुधारली, त्यांच्या गावात अंगणवाडी काढली त्यासही उत्कृष्ठ आंगणवाडीचा पुरस्कार मिळाला आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून गावातील महिलांचा मुलांबद्दलचा महत्वाचा प्रश्न त्यांनी मार्गी लावला आहे. त्यामुळे त्या महिलांच्या अत्यंत लाडक्या नेत्या आहेत.

ठाकरेताई धार्मिक क्षेत्रातही मागे राहिलेल्या नाहीत परिसरातील अनेक धार्मिक स्थळांकरिता लागणाऱ्या साहित्यासाठी, मदतीसाठी एन. के. टी.ट्रस्टच्या माध्यमातून माध्यमातून डॉ.नानजीभाईंकडून मदत करतात. एकंदर त्यांच्या समाजकारण ते सरपंचचा आलेख पाहिल्यास आपल्याला त्यांचा कार्यकौशल्यपणा दिसून येते. ज्या गावात पाणी, वीज, रस्ते व्यवस्थित असतील त्या गावाची प्रगती होण्यासाठी वेळ लागत नाही. यागोष्टी असल्यास रोजगार उपलब्ध होऊ शकतो. सुवर्णाताईंनी या गोष्टीकडे खास लक्ष पुरवून कित्येक ठिकाणी बोअरवेलची सुविधा नानजीभाईंकडून मिळवल्या. त्यामुळे महिलांना पाण्यासाठी जी पायपीट करावी. लागत होती ती आता करावी लागत नाही. सौ. सुवर्णाताई यांच्याकडे अनेक पैलू आहेत. प्रत्येक पैलूतून त्यांच समाजकारण स्पष्ट दिसून येते. त्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी कोणतेही काम केलेले







नाही. नावासाठीही त्यांनी काम केलेले नाही. तसे केले असते तर त्या आज नक्कीच पंचायत समितीवर गेल्या असत्या. त्यांच्यातील कार्यकुशलता त्याना नक्कीच खेचून नेली असती. जरी नावासाठी काम करत नसल्या तरी त्यांच्या कौशल्यतेचा फायदा समाजाला व्हावा या उद्देशाने त्यांनी आपले पाऊल पुढे टाकावे जेणेकरुन गावापासून सुरु केलेले राजकारण पंचायत समितीकडे कुच करेल आणि संपुर्ण जनतेचे सुवर्णाताईंना भले करता येईल.

डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्याबरोबर मुरबाड मधील अनेक कार्यक्रमास जाण्याचा योग आला होता. त्यातूनच त्यांनी केलेल्या कार्याची ओळख जवळून झालेली आहे. त्यांनी केलेले कार्य नक्कीच महिला सरपंच म्हणून उत्कृष्ट आहे. काम करवून घेण्याची कलाही त्याच्यांत असल्यामुळे त्या सहकाऱ्यांकडून उत्तमरीत्या काम करुन घेतात. बऱ्याच वेळेस सहकाऱ्यांबरोबर चांगले संबंध नसल्यास आपल्याला काम करायला त्रास होतो. लोकांच्या समस्या वेळेत सोडवल्या जात नाहीत. परंतु ठाकरेताई मात्र याही बाबतीत यशस्वी झाल्या आहेत. हरहुन्नरी, कार्यक्षम समाजसेविका आणि ग्रुप ग्रामपंचायत नागांवच्या सरपंच सौ. सुवर्णा गणपत ठाकरे यांचा ६ सप्टेंबरला वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने त्यांची दिवसेंदिवस अशीच प्रगती होत राहो जेणेकरुन समाजाची प्रगती होईल. देशाची प्रगती होईल. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा. उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना.

# पर्यटनस्थळी मूलभूत सुविधांचा अभाव; शौचालयांचे शेड गायब, पर्यटकांची मोठी गैरसोय

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील अत्यंत सुंदर आणि प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या डॉन हिल स्टेशनवर पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. चारही बाजूंनी पसरलेली हिरवाई, उंचच उंच डोंगररांगा आणि धुक्याने वेढलेले मनमोहक वातावरण यामुळे डॉन हिल स्टेशन पर्यटकांच्या पसंतीचे ठिकाण बनले आहे. दररोज शेकडो पर्यटक कुटुंबीय आणि मित्रांसह येथे दाखल होत आहेत.मात्र, एकीकडे पर्यटनस्थळावर पर्यटकांची संख्या वाढत असताना दुसरीकडे मूलभूत सार्वजनिक सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. विशेषतः पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या शौचालय आणि स्नानगृहांच्या दुरवस्थेमुळे मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. स्थानिक ग्रामपंचायतीमार्फत उभारण्यात आलेल्या शौचालय आणि स्नानगृहांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, या सुविधांवरील पत्र्यांचे शेडच गायब झाले आहेत. त्यामुळे शौचालय आणि स्नानगृह अक्षरशः उघड्यावर आले असून, ही



सुविधा वापरणेही पर्यटकांसाठी मोठे आव्हान बनले आहे. पावसाळ्यात पाऊस सुरू असताना शेडविना असलेल्या शौचालय आणि स्नानगृहांमुळे महिला, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. पर्यटकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाकडून डॉन हिल स्टेशनचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात मात्र पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे. पर्यटनस्थळाचा विकास केवळ रस्ते आणि सुशोभीकरणापुरता मर्यादित न राहता, पर्यटकांसाठी स्वच्छ व पुरेशी शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे शुद्ध पाणी, कचरापेट्या तसेच बसण्यासाठी आणि विश्रांतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या परिस्थितीमुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, ग्रामपंचायत, पर्यटन समिती तसेच संबंधित प्रशासनाने तातडीने डॉन हिल स्टेशनची पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. दुरवस्थेत असलेल्या शौचालय व स्नानगृहांची तातडीने दुरुस्ती करून नवीन शेड उभारावेत, तसेच पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेऊन अतिरिक्त शौचालय ब्लॉक उभारण्यात यावेत, अशी जोरदार मागणी पर्यटक आणि स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



ठाणे : दिवा विकास प्रतिष्ठान तर्फे नगरसेवक शैलेश मनोहर पाटील आयोजित दहीहंडी उत्सव यंदाही मोठया दणक्यात साजरा करण्यात आला प्रसंगी दहीहंडी फोडण्यासाठी आलेल्या गोविंदांचा मोठा जल्लोष पहावयाला मिळाला तर उत्साहाला उधाण आले होते. **(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...



### ठाणे पालिका क्षेत्रात दहीहंडी उत्सवात १२ गोविंदा जखमी

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे पालिका क्षेत्रात दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा होत असताना गोविंदा पथकांमधील काही गोविंदा जखमी झाले आहेत. आज सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ४, तर जिल्हा शासकीय रुग्णालयात ८ अशा एकूण १२ गोविंदांवर उपचार सुरू आहेत. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल झालेल्या गोविंदांमध्ये जतिन पाटील यांच्या कमरेला व मानेला दुखापत झाली असून, जतिन केशरी यांच्या कमरेला दुखापत झाली आहे. नंदकिशोर शेलार यांच्या डोक्याला दुखापत झाली असून निखिल यादव यांच्या डाव्या हाताला किरकोळ दुखापत झाली आहे. दरम्यान, जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल ८ गोविंदांपैकी ओमकार शिंदे यांच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. हर्ष शर्मा यांच्या पाठीला, गिरीश चिपकर यांना किरकोळ दुखापत, अमन यादव यांच्या उजव्या हाताला, आयुष गुप्ते यांच्या पाठीला, अमेय नाईक यांच्या उजव्या हाताला, आकाश घाडगे व अनिश रोकडे यांच्या उजव्या पायाला दुखापत झाली आहे. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.



### महिरावणी येथे ७० विद्यार्थी शिकविताना शिकले 'शिक्षकत्व'

नाशिक (स. गांवकरी) : महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षक व भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.शिक्षक दिनाचे औचित्य साधून इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कुमारी तनिष्का कापसे हिने मुख्याध्यापकाची भूमिका समर्थपणे पार पाडली, तर तब्बल ७० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यार्थी शिक्षक बनून विविध वर्गांमध्ये अध्यापनाचे कार्य केले. सात विद्यार्थ्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका पार पाडत शालेय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यावेळी विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व व भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याची माहिती देत मनोगत व्यक्त केले.शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांना भेटकार्ड व पेन देऊन आदर व्यक्त केला. दिवसभर विद्यार्थी शिक्षकांनी उत्साहाने अध्यापन केल्यानंतर आपल्या अनुभवांचे मनोगत व्यक्त केले. 'शिक्षक होणे म्हणजे केवळ शिकवणे नव्हे, तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनाला समजून घेऊन त्याला घडविण्याची जबाबदारी आहे,' अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.




### शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाचे दिशादर्शक : संगीता शहा

सोलापूर (स. गांवकरी) : बोरामणी येथील कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या सचिवा सौ. संगीता शहा अध्यक्षस्थानी होत्या, तर सुरवसे प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या माजी प्राचार्या सौ. उज्वला साळुंके प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्या सौ. आसमा नदाफ व पर्यवेक्षिका सौ. अमृता कोरीशेट्टी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना सौ. संगीता शहा म्हणाल्या, "शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, संस्कारांची आणि विचारांची जडणघडण करण्याचे कार्य शिक्षक करतात." बदलत्या काळानुसार शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान व अध्यापनाच्या नवनवीन पद्धती आत्मसात करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उज्वला साळुंके यांनी शिक्षकांची भूमिका स्पष्ट करताना, "भावी आयुष्यात सुज्ञ व सुजाण नागरिक घडविण्यात शिक्षकांचा मोठा वाटा असतो," असे प्रतिपादन केले.

# रेल्वे स्टेशन अन् गल्लीबोळात वसुलीचा धडाका

सोलापुरात वाहतुकीचा उडाला रोजच फज्जा! दररोजच्या वाहतूक कोंडी मुळे नागरिकांचे जीवन धोक्यात

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर शहरातील मुख्य रस्त्यांवर दररोज वाहतुकीचा पार 'बंट्याबोळ' होत असताना, सोलापूर वाहतूक पोलीस मात्र वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याऐवजी रेल्वे स्टेशन परिसर आणि गल्लीबोळांतील कोपऱ्यावर लपून 'वसुलीचा धडाका' चालवत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. जिथे वाहनांमुळे रस्त्याला काहीही अडथळा येत नाही, अशा ठिकाणी पोलीस अचानक अतिउत्साही होऊन फोटो काढणे, दंड ठोकणे आणि लायसन्स, PUC, इन्शुरन्सच्या नावाखाली केवळ 'खिसा गरम' करण्यात व्यस्त आहेत. मग हाच तत्परतेचा स्टंट संपूर्ण शहरातील मुख्य रस्त्यांवर का गायब होतो? असा संतप्त सवाल आता सोलापूरकर विचारत आहेत.



कारवाईचा स्टंट कोपऱ्यावर, शहरात मात्र रोजचे मरण! रेल्वेच्या कंपाऊंडमध्ये आणि गल्लीबोळात थांबून वाहनचालकांना अडवणारे पोलीस शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि गजबजलेल्या बाजारपेठेत मात्र पूर्णपणे ढिम्म पडले आहेत.

भररस्त्यात बेशिस्त पार्किंग: शहरातील मुख्य रस्त्यांवर फोर-व्हीलर, ऑटो रिक्षा आणि दुचाकी भररस्त्यात कशाही पार्क केल्या जातात. अचानक ब्रेक अन् जीवघेणे अपघात: ऑटो रिक्षा आणि खासगी वाहने कुठेही अचानक थांबवली जातात, ज्यामुळे रोज अपघात घडत असून नाहक वाद-भांडणे आणि नागरिकांचा बळी जात आहे.

तपासणीच्या नावाखाली आर्थिक गणित: वाहतूक कोंडी सोडवण्याऐवजी कोपऱ्यात थांबून कागदपत्रांच्या चेकिंगच्या नावाखाली वसुली करणे, हाच पोलिसांचा मुख्य अजेंडा बनला आहे का?

हा भेदभाव कशासाठी? आर्थिक व्यवहारांची डोळेझाक? ज्या ठिकाणी गाड्या लावल्याने वाहतुकीला कोणतीही अडचण येत नाही, तिथे कॅमेरा घेऊन दंड ठोकणारे पोलीस, शहरात उघड्या डोळ्यांनी वाहतुकीची वाट लागत असताना गप्प का? हा निव्वळ भेदभाव आहे की यामागे काही दुर्लक्षित 'आर्थिक व्यवहार' आणि ठरलेली गणिते आहेत? असा रोखठोक आरोप आता नागरिक करत आहेत.

शिवबाराजे न्यूज चॅनलचा इशारा आणि सोलापूरकरांची मागणी! गल्लीबोळात थांबून कागदपत्रांच्या नावाखाली चालणारा हा 'खिसा गरम' करण्याचा प्रकार तात्काळ बंद करावा. ज्या तत्परतेने रेल्वे स्टेशन परिसरात दंडात्मक कारवाई केली जाते, तशीच प्रामाणिक तत्परता संपूर्ण शहरात दाखवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करावी. केवळ एकाच ठिकाणी कारवाईचा सोहळा न भरवता संपूर्ण सोलापूर शहरातील मुख्य रस्त्यांवरील बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करून वाहतूक पोलिसांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, अशी मागणी सोलापूरकर नागरिक करत आहेत.!

# खिर्डी येथे महिलांची दहीहंडी उत्साहात संपन्न

रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील श्रीकृष्ण मंदिर संस्थान, खिर्डी येथे महिलांसाठी प्रथमच दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील महिलांची अशा प्रकारची दहीहंडी प्रथमच आयोजित करण्यात आल्याने परिसरातील महिला व भक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या दहीहंडी सोहळ्यात महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. दहीहंडी फोडण्यासाठी महिलांनी एकत्र येत उत्साहपूर्ण वातावरणात प्रयत्न केले. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. *"गोविंदा आला रे आला"*च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या दहीहंडीचे आयोजन श्रीकृष्ण मंदिर संस्थानचे मठाधिपती महंत चोरमांगे



बाबा शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयोजनासाठी प्रदीपदादा पंजाबी, प्रगती ताई पंजाबी तसेच गावातील भक्तमंडळींचे मोलाचे सहकार्य लाभले. महिलांना धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या आगळ्यावेगळ्या दहीहंडी सोहळ्याचे पंचक्रोशीतील भाविकांकडून कौतुक करण्यात आले.

# तब्बल २५०० भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

नाशिक : (स. गांवकरी)

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी नंद महाराज आणि समस्त व्रजवासीयांद्वारे बाळकृष्णाच्या आनंदमय प्राकट्यानिमित्त स्वागतासाठी नंदोत्सव साजरा करण्यात आला. तसेच याच दिवशी इस्कॉनचे संस्थापकाचार्य श्रील प्रभुपाद यांचा जन्म झालेला असल्याने, जगभरातील सर्व इस्कॉन मंदिरांमध्ये नंदोत्सवाच्याच दिवशी प्रभुपादांचा आविर्भाव दिनही मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर द्वारका परिसरातील इस्कॉन श्री श्री राधा मदन गोपाल मंदिरात शुक्रवारी (५ सप्टेंबर) नंदोत्सव आणि श्रील प्रभुपाद आविर्भाव महोत्सव अतिशय भक्तिमय आणि आनंददायी वातावरणात पार पडला. महोत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता मंगल आरतीने झाली. यानंतर



- इस्कॉन नाशिक मंदिरात 'नंदोत्सव' व श्रील प्रभुपाद आविर्भाव महोत्सव उत्साहात संपन्न

भाविकांनी हरे कृष्ण महामंत्र जप केला, नंतर भावमधुर भजने गायली गेली व श्रीमद्भागवत प्रवचन झाले. प्रवचनानंतर श्रील प्रभुपाद यांच्या आविर्भाव दिनानिमित्त त्यांना सर्वप्रथम विविध भोग अर्पण करण्यात आले आणि भाविकांच्या वतीने भावपूर्ण पुष्पांजली अर्पण करून विशेष महा गुरूपूजा पार पडली.

### नावात बदल

माझे विवाहपूर्वीचे नाव — कु. सादिया शकील तांबोळी हे बदलून, विवाहानंतर माझे नाव आधार क्रमांक 200430458425 नुसार सौ. सादिया अरबाज तांबोळी असे झाले आहे.

# मुंबईतील बैठक आता नाशिकमध्ये

- ८ सप्टेंबरला कालिका माता मंदिरात सकल मराठा समाजाची राज्यस्तरीय बैठक
- मराठा आरक्षणासह प्रलंबित प्रश्नांवर निर्णायक चर्चा
- राज्यभरातील जिल्हानिहाय समन्वयक व समाजबांधवांची उपस्थिती




नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील सकल मराठा समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्णायक चर्चा करून आगामी काळातील समाजाची भूमिका निश्चित करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली सकल मराठा समाजाची निमंत्रित राज्यस्तरीय बैठक आता मुंबईऐवजी नाशिक येथे होणार आहे.मुंबई येथे काही कारणास्तव सभागृह उपलब्ध न झाल्याने तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील समन्वयक व समाजबांधवांशी चर्चा केल्यानंतर बैठक नाशिक येथे घेण्याबाबत एकमत झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

ही महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार, दि.८सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नाशिकचे ग्रामदैवत कालिका माता मंदिर, मुंबई नाका येथील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये समाजासाठी काम करणाऱ्या प्रमुख समाजबांधवांना या बैठकीस निमंत्रित करण्यात आले असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहणार आहेत.

मराठा समाजाला महायुती सरकारने SEBC अंतर्गत दिलेले १० टक्के आरक्षण सध्या न्यायप्रविष्ट आहे.या आरक्षणाला भविष्यात घटनात्मक संरक्षण मिळावे, यासाठी शासनाने कोणत्या ठोस आणि कायदेशीर उपाययोजना कराव्यात,यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सारथीच्या माध्यमातून मिळणाऱ्या योजनांचा विस्तार, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी,प्रत्येक जिल्ह्यात मराठा समाजासाठी वसतिगृहांची उपलब्धता, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक व आर्थिक सवलती तसेच मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान समाजबांधवांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेणे या विषयांवरही समाजाची भूमिका निश्चित करण्याबाबत चर्चा होणार आहे.

याशिवाय कोपर्डी भगिनींच्या प्रकरणातील उर्वरित दोन दोषींना फाशीची शिक्षा कधी होणार?हा समाजाच्या भावनांशी निगडित अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा प्रश्न असून,या प्रकरणातील पुढील कायदेशीर प्रक्रिया व शासनाची भूमिका याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय बैठकीच्या पूर्वतयारीसाठी नाशिकमध्ये बैठक

राज्यस्तरीय बैठक यशस्वी करण्यासाठी नाशिकमध्ये पूर्वनियोजनाची बैठक घेण्यात आली.मुंबई नाका येथील छावा क्रांतिवीर सेनेच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या बैठकीत राज्यस्तरीय बैठकीच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत राज्यातील समाजबांधवांसमोर मांडण्यात येणारे विविध प्रश्न,त्यावरील चर्चा,नियोजन,उपस्थिती तसेच बैठकीच्या अंतिम तयारीचा आढावा घेण्यात आला.

या पूर्वनियोजन बैठकीस मराठा समाजाचे नेते सुनील बागुल, डॉ विलास पांगारकर,करण गायकर, नानासाहेब बच्छाव,शिवाजी सहाने, चंद्रकांत बनकर,आशिष हिरे, नितीन सुगंधी,अण्णा पिंपळे, अनिल आहेर,राम निकम, वैभव दळवी,अक्षय कातड, सागर लोणे,विनायक ढेमसे यांच्यासह नाशिक जिल्ह्यातील अनेक समाजबांधव उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची पालकमंत्री गिरीश महाजनांकडून कळवणउपजिल्हा रुग्णालयात पाहणी

- सेंट्रल किचन बंद करण्याचीआदिवासी संघटनांची जोरदार मागणी
- मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्र्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन

कळवण : (स. गांवकरी)

विसापूर येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थिनी सृष्टीओंकार सूर्यवंशी हिच्या दुर्दैवी मृत्यूनंतरआश्रमशाळेतीलविद्यार्थ्यांच्याआरोग्याचा प्रश्न ऐरणीवरआला आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडूनआजारी विद्यार्थ्यांवर उपचार तसेचत्यांच्याआरोग्यावर विशेष लक्ष दिले जातअसताना, नाशिकचे पालकमंत्री गिरीश



महाजन यांनी शनिवारी कळवण उपजिल्हारुग्णालयाला भेट देत उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी मा.मंत्री तथा भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ.भारती पवार,आमदार नितीन पवार,नाशिकचे जिल्हाधिकारीआयुष प्रसाद,उपजिल्हाधिकारी डॉ.कश्मिरा संखे, पोलीसअधीक्षक स्वामी,तहसीलदार रोहिदास वारोळे, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष दीपक खैरनार,दादाजी मोरे,अशोक पाटील, सुधाकर पगार,गोविंद कोठावडे,डॉ अनिल महाजन,मुना काकुळते,हेमंत रावले, चेतन निकम,चिंतामण गायकवाड,सुधाम भोये तसेच आदिवासी संघटनांचे सोनू गायकवाड,पुजारा खांडवी,जयेश संघटनेचे पदाधिकारी वअन्य कार्यकर्ते उपस्थित होते. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी रुग्णालयात दाखल विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या उपचारांची, उपलब्ध औषधांची तसेचरुग्णालयातीलआरोग्य व्यवस्थेची त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्याआरोग्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा होऊ नये, आजारी विद्यार्थ्यांना तातडीने वआवश्यक वैद्यकीय उपचार मिळावेत,अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित प्रशासनाला दिल्या. दरम्यान,विसापूर आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूनंतर विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजनाच्या गुणवत्तेचा आणि सेंट्रल किचनच्या व्यवस्थेचा मुद्दाही गंभीरपणे पुढेआला आहे.

विविधआदिवासीसंघटनांच्याप्रतिनिधींनी पालकमंत्री गिरीश महाजन यांची भेट घेत विद्यार्थ्यांना दिले जाणारे भोजन,त्याची गुणवत्ता,स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित विविध प्रश्न मांडले. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर ताजे, पौष्टिक व सुरक्षित भोजन उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितले. सेंट्रल किचनची व्यवस्था बंद करून आश्रमशाळेच्या ठिकाणीच भोजन व्यवस्था करण्याची मागणी यावेळी करण्यातआली.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित बाबअसल्याने भोजन व्यवस्थेची नियमित तपासणी,अन्नाची गुणवत्ता,स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची निगराणी याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही करण्यातआली. मुख्यमंत्री वआदिवासी विकास मंत्र्यांशी चर्चा करण्याचे महाजनांचे आश्वासनआदिवासी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेले प्रश्न पालकमंत्री गिरीश महाजन यांनी सविस्तरपणे ऐकून घेतले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे

## ग्लोबल गुरुजी पुरस्कार अनिता परदेशी यांना जाहीर



आळंदी (स. गांवकरी) : पुणे जिल्हा परिषदेचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या सिंगापूर येथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करून आंतरराष्ट्रीय स्तरावरची शिक्षण पद्धती पुणे जिल्हा परिषदेमध्ये राबविण्या साठी सुरू केलेल्या ग्लोबल गुरुजी पुरस्कारासाठी बाराशे शिक्षकां मधून निवड जाहीर झाली. ही निवड झालेल्या ४५ शिक्षकांमध्ये पुणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरे पुणे शाळेच्या आदर्श शिक्षिका अनिता शरद परदेशी यांची निवड झाल्या बद्दल शाळेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील दौऱ्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांचेसह सर्व शिक्षक वृंद पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, शाळा व्यवस्थापन समिती धानोरे, ग्रामपंचायत धानोरे,विद्यार्थी व शिक्षक वृंद आदर्श शाळा धानोरे यांचे तर्फे निवडीचे स्वागत करण्यात आले. ही शाळा ओळख श्री ज्ञानेश्वरीची एक परिवार घटकातील असून परिवार तर्फे श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## अर्ज सादर करण्यास ११ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

मुंबई (स. गांवकरी) : राज्य शासनाच्या वतीने सन २०२५ पासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे. यावर्षीपासून देशभरातील आणि देशाबाहेरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीही स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली असून जास्तीतजास्त गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, या उद्देशाने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख आता शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठीचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके पटकावावीत, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## ग्रामीण मातीतून अध्यात्माचा झंकार थेट गोव्यापर्यंत; गोव्यात कीर्तनसेवा



कोपरगांव (स. गांवकरी) : ग्रामीण भागातून वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन अध्यात्म, भक्ती आणि प्रबोधनाची सेवा करणारे ह.भ.प. साईराम महाराज रहाणे यांची कीर्तनसेवा आता थेट गोवा राज्यात रंगणार आहे. मूळचे जवळके, ता. कोपरगाव येथील असलेल्या महाराजांचे कीर्तन गोव्यातील पालये,तुये पेडणे (गोवा) येथे आयोजित करण्यात आले आहे. श्रावण चौथा गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता सिद्धी साई भक्त मंडळाच्या वतीने या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातून आलेल्या साईराम महाराजांनी आपल्या ओघवत्या वाणीने, संतांच्या विचारांनी आणि भक्तिमय कीर्तनातून वारकरी संप्रदायाची शिकवण जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या कीर्तनातून भक्तीबरोबरच सामाजिक प्रबोधन, संस्कार आणि संतविचारांचा जागर केला जातो. जवळकेसारख्या ग्रामीण भागातून सुरू झालेली ही कीर्तनसेवा आता थेट गोव्यापर्यंत पोहोचत असल्याने जवळकेसह कोपरगाव तालुक्यातील वारकरी, ग्रामस्थ आणि भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. "जवळकेच्या मातीतून सुरू झालेली कीर्तनसेवा आज गोव्याच्या भूमीत पोहोचत आहे, ही संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब आहे. वारकरी संप्रदायाची सेवा आणि संतविचारांचा प्रसार करण्याचे कार्य साईराम महाराज सातत्याने करत आहेत."

## दिवा मुंब्रादेवी कॉलनीतील गुरुदर्शन नगरमध्ये रस्त्याचे लोकार्पण



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी परिसरातील गुरुदर्शन नगर येथे 'वचनपूर्ती' रस्त्याचे लोकार्पण रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या हस्ते या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले. स्थानिक रहिवासी नागरिकांच्या दैनंदिन ये-जा करण्याच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून, रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. विकासकामांचे आश्वासन पूर्ण झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत परिसरातील प्रलंबित विकासकामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त केला. निवडणूक काळात नागरिकांच्या मागणीनुसार या रस्त्याच्या कामाची वचनपूर्ती केले असलेल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. सदर लोकार्पण सोहळ्यास कैलेश पाटील, भालचंद्र भगत प्रदीप पाटील यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर गुरुदर्शन नगरमधील किरण जाधव, राजा भंडारी, रमेश कडवेकर, मंगेश सकपाळ, आदित्य कदम, समीर भारद्वाज, पप्पू साळवी, विजय जैस्वाल, अशोक कदम, सुनील लांजेककर, गिरीश सुरे, आकाश वाळकेकर, आकाश दिवाळे, कृष्णा जैस्वाल, संदीप बाईत, मनीषा सोनवणे आदी सद्गुरु नगरमधील रहिवाशी व शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांचा भव्य सत्कार



सोलापूर (स. गांवकरी) : वैराग नगरी ही संतांची भूमी आहे, इथल्या माणसांमध्ये भक्ती आणि माणुसकी दोन्ही आहे. आपण जो प्रेम आणि आदर दिला हा माझा एकट्याचा सन्मान नसून तो समस्त अक्कलकोट करांचा सन्मान आहे कारण हे दोन्ही स्थाने देवभुमी आहेत म्हणून वैराग आणि अक्कलकोटचे नाते हे भक्तीचे नाते असल्याचे मनोगत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी व्यक्त केले. नुकतेच वैराग नगरीचे ग्रामदैवत श्री सच्चिदानंद संतनाथ महाराजांच्या पवित्र नगरीमध्ये पुजारींच्या निवास स्थानी सोलापूर जिल्हा भाजपा युवा मोर्चा सचिव व पुजारी उदयजी क्षीरसागर यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांचा संतनाथ महाराजांची प्रतिमा, शाल, फेटा, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सत्काराला उत्तरीय मनोगत व्यक्त करताना नगरसेवक महेश इंगळे बोलत होते.

# शिक्षकांचा 'जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरव

### ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांचे योगदान मोलाचे; विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या शैक्षणिक उपक्रमांवर भर

ठाणे : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, आधुनिक आणि सर्वसमावेशक शिक्षण देण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने वाढ करण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाची दखल घेत जिल्हा परिषद, ठाणेच्या शिक्षण विभागामार्फत आज, दि. ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी बी. जे. हायस्कुल येथे 'जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२६-२७' सोहळा उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमास आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, उपशिक्षणाधिकारी संदीप पाटील, नगरसेवक विकास पाटिल, उपशिक्षणाधिकारी कुंदा पंडीत, शुभांगी बढे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजाराव, जिल्हा समन्वयक अनिल कुऱ्हाडे यांच्यासह सर्व गट शिक्षण अधिकारी, शिक्षकवृंद आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी- कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा, सोनाळे येथील विद्यार्थ्यांनी ईशस्तवन सादर केले.आमदार संजय केळकर यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करत शिक्षकांच्या कार्याचे कौतुक केले. शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि भवितव्याची घडण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे त्यांनी सांगितले.

आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांनाही पुरस्कार देण्याची मागणी करत सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मार्गदर्शन करताना आश्वासित प्रगती योजना, आंतरजिल्हा बदली आणि पवित्र पोर्टलवरील भरती यांसारख्या विषयांवरही त्यांनी भाष्य केले.

शिक्षकांना कामकाज करताना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत विधानसभेतही सातत्याने भूमिका मांडत असून, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिक्षकांच्या वेतनवाढीसंदर्भातही पुढील काळात प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांना शुभेच्छा देत, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षकांनी करत असलेल्या कार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

आमदार निरंजन डावखरे यांनी शिक्षकांचे अभिनंदन करताना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. आज इंटरनेट आणि तंत्रज्ञानामुळे संपूर्ण जग विद्यार्थ्यांच्या जवळ आले आहे. या तंत्रज्ञानातील चांगल्या आणि उपयुक्त बाबींची विद्यार्थ्यांना ओळख करून देत त्यांना योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी करावे, असे त्यांनी आवाहन केले.

आजचे विद्यार्थी भविष्यात विविध क्षेत्रांत काम करताना आपली वेगळी ओळख निर्माण करतील. विद्यार्थ्यांच्या यशाचा अभिमान शिक्षकांना वाटावा, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, असे त्यांनी सांगितले. शिक्षकांच्या नावापुढे 'Tr.' ही पदवी लावण्याबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका मांडत यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

## शिर्डीत रंगणार राष्ट्रीय गो चॅम्पियनशिपचा थरार

कोपरगांव : (स. गांवकरी)

- २० हून अधिक राज्यांतील ३०० हून अधिक अव्वल खेळाडूंचा सहभाग; ८ सप्टेंबरला भव्य उद्घाटन

इंडो ॲमॅच्युअर गो असोसिएशनच्या तत्वाधानाखाली व गो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने नॅशनल गो चॅम्पियनशिप २०२६चे आयोजन ८ ते १० सप्टेंबरदरम्यान साई संस्थान क्रीडा संकुल, शिर्डी येथे करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील २० हून अधिक राज्यांमधील ३०० पेक्षा अधिक टॉप रँकिंग खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा ८ सप्टेंबर रोजी सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. गाडिलकर सर यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, इंडो ॲमॅच्युअर गो असोसिएशनचे कार्यकारी सचिव चंदन पांडे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. इंडियन फ्लोर बॉल असोसिएशनचे सचिव रविंद्र चौथवे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, गो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष अहमद लालानी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याबाबत आयोजन सचिव अनिल सहारे यांनी सांगितले की, शिर्डीच्या पावन भूमीत राष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा होत असून, महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. तरुण पिढीला बौद्धिक खेळांकडे आकर्षित करणे हा स्पर्धेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय गो फेडरेशनच्या नियमानुसार ही स्पर्धा होणार असून विजेत्या खेळाडूंना पारितोषिक, ट्रॉफी, पदक तसेच राष्ट्रीय क्रमवारीत स्थान मिळणार आहे.

## पडघ्यात रंगला कृष्ण जन्मोत्सव अन् दहीहंडीचा उत्सव

भिवंडी : (स. गांवकरी)



भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरात विविध मंडळे, राजकीय पक्ष, सार्वजनिक मित्रमंडळांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गोविंदा पथकांच्या जल्लोषाने आणि 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने संपूर्ण पडघा परिसर दुमदुमून गेला. दहीहंडी उत्सवानिमित्त सकाळपासूनच पडघा बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण होते.

पडघे गावात गेल्या ८० वर्षापासून सुरू असलेली कृष्ण जन्म महोत्सवाची परंपराही यंदाही मोठ्या उत्साहात कायम राखण्यात आली. सुदर्शन नगर येथून संपूर्ण पडघे गावातून श्रीकृष्ण भगवानांची वेशभूषा केलेल्या बालकृष्णाची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक वाजत-गाजत काढण्यात आली. पारंपरिक पद्धतीने साजरा होणाऱ्या या कृष्ण जन्म महोत्सवात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पडघा शहर व विभाग, सिद्धिविनायक प्रतिष्ठान, एकता मित्रमंडळ यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि सार्वजनिक मित्रमंडळांच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

दहीहंडी फोडण्यासाठी ओमसाई गोविंदा पथक, जय बजरंग गोविंदा पथक, सुदर्शन गोविंदा पथक यांसह विविध गोविंदा पथकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पथकांनी एकामागून एक थर रचत उंच मानवी मनोरे उभारले आणि दहीहंडीला दिमाखदार सलामी दिली. डीजेच्या तालावर थिरकणारे तरुण, ढोल-ताशांचा गजर आणि 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषामुळे वातावरणात उत्साह संचारला होता. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांनी थरावर थर रचत आपले कौशल्य आणि शारीरिक सामर्थ्य पणाला लावले. उंच मनोरे रचून हंडी फोडण्याचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पडघ्यातील बस स्थानक, विद्यानगर, शीतल शरद अपार्टमेंट यांसह विविध ठिकाणी दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विविध मंडळांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केल्याने उत्सवाला आणखी रंगत आली. गोविंदा पथकांच्या धाडसी कामगिरीला उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्स्फूर्त घोषणांनी दाद दिली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी दहीहंडी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. परंपरा, उत्साह, साहस आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देत पडघ्यातील दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

## वसुंधरा ॲकॅडमीत गोकुळाष्टमीचा भक्तिमय जल्लोष

अकोले : (स. गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमीत गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्णाच्या जीवनातील मूल्ये, त्यांच्या शिकवणी आणि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण वातावरण कृष्णमय झाले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक श्री. मधुकरराव नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले,मारुतीराव कोते पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., सिनिअर कॉलेजच्या प्राचार्या कुसुम वाकचौरे, ज्युनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख पुंड मॅडम तसेच संस्थेतील इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक श्री. मधुकरराव नवले यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाचा महिमा, त्यांचे जीवनकार्य आणि भगवद्गीतेतील मूल्यांची माहिती सांगत प्रभावी मार्गदर्शन केले. श्रीकृष्णाने दिलेला कर्म, कर्तव्य, सत्य आणि धर्माचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. 'गोविंद बोलो, हरी गोपाल बोलो' या गीतावर विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर केले. या नृत्याला प्रशांत दिवेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच 'श्रीकृष्ण महिमा' हे भक्तिगीत विद्यार्थ्यांनी सुरेलपणे सादर केले. या गीतासाठी इंद्रभान कोल्हाळ यांचे मार्गदर्शन लाभले. मारुतीराव कोते पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 'गोविंदा आला रे, गोविंदा आला' या गीतावर उत्स्फूर्त नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही श्रीकृष्णावर आधारित सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेला अभिनव शिक्षण संस्थेचा सामूहिक दहीहंडी फोडण्याचा सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एकजुटीने दहीहंडी फोडताच परिसरात श्रीकृष्णाच्या जयघोषाने आणि टाळ्यांच्या कडकडाटाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर सर्वांनी सामूहिक नृत्य करत गोपालकाल्याचा आनंद लुटला. उपस्थितांना गोपालकाल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुतीराव कोते पब्लिक स्कूलचे हेमंत मंडलिक, वसुंधरा अकॅडमीच्या सोनिया कोल्हे आणि काळे मॅडम यांनी प्रभावीपणे केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, गायन, संस्थापकांचे प्रेरणादायी मार्गदर्शन आणि दहीहंडी सोहळा यामुळे गोकुळाष्टमीचा उत्सव अविस्मरणीय ठरला. सर्व शिक्षकांच्या नियोजनबद्ध मेहनतीतून आणि सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## सण उत्सवाच्या काळात उभारणाऱ्या कमानींवर कारवाईची मागणी

ठाणे : (स. गांवकरी)



दिवा शहरात सण उत्सवाच्या काळात उभारणाऱ्या कमानींवर पत्रकारांनी कारवाईची मागणी केली आहे. दिवा शहरातील प्रमुख रस्ते, चौक, प्रवेशद्वार, फुटपाथ तसेच सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या अनधिकृत कमानींना प्रतिबंध करून नियमबाह्य कमानींवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी दिवा शहरातील पत्रकारांच्या संयुक्त वतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे. गणेशोत्सव, नवरात्री तसेच दीपावली असे आनंदाचे सण व उत्सव असून ते शांततेत, सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणे आवश्यक आहे. मात्र, परवानगीशिवाय अथवा नियमांचे पालन न करता उभारण्यात येणाऱ्या कमानींमुळे अनेक ठिकाणी वाहतुकीला अडथळा निर्माण होण्यासह पादचाऱ्यांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने व अन्य आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होऊ शकतो. दिवा शहरातील वाढती लोकसंख्या, अरुंद रस्ते आणि मोठ्या प्रमाणातील वाहतूक लक्षात घेता सार्वजनिक रस्ते व वाहतुकीच्या मार्गावर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने दखल घ्यावी व परवानगी दिलेल्या कमानींचीही प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्याचे आवाहन करण्यात यावे.

## गुणवान व प्रामाणिक शिक्षकांचा सर्वत्र सन्मान होतो - प्रा. भीमाशंकर शेटे

सोलापूर : (स. गांवकरी)

जगात गुणी, आचरणातून मूल्ये रुजविणाऱ्या व सामाजिक बांधिलकी मानून काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होतो व समाज त्यांच्याकडे आदराने पाहतो. परंतु त्याचबरोबर बदलत्या परिस्थितीत शिक्षकांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे व स्वतःला अद्यावत ठेवले पाहिजे असे प्रतिपादन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे यांनी केले.




ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा व सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती यांच्यावतीने आयोजित व श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर यांच्या सहकार्याने गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एल.जी. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या सचिवा डॉ. नभा काकडे या होत्या.

यावेळी श्री. सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे विश्वस्त पशुपतीनाथ माशाळ, ॲड. आर. एस. पाटील, एफ.पी.ए.आय. सोलापूरशाखेचे चेअरपर्सन डॉ. गौरी कहाते, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील, पुरस्कार निवड समिती समन्वयक डॉ. श्रीकांत येळेगावकर, मंगळवेढा तालुक्यातील नंदूरगाव गावचे सरपंच श्रीशैल गोडसे, आप्पासाहेब चव्हाण, डॉ. राजीव प्रधान, डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. विजया महाजन, सपना चिट्टे, माजी चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, संगमेश्वर रघोजी, सिद्राम कोतली, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षक मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे यांच्याहस्ते गुणवंत शिक्षकांचा सन्मानपत्र, शाल व बुके देवून सन्मान करण्यात आला.

यांचा झाला सन्मान- श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण,* वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. नागनाथ धायगोडे, , द. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनल सोसायटीचे उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक ए. गफूर ए. गनी सगरी, सु. रा. मुलींची सेवासदन प्रशालेच्या सहशिक्षिका अश्विनी मोरे (वाघमोडे),, श्रीमती कमला नेहरू प्राथमिक मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा राघवेंद्र जहागीरदार, श्री. सुशीलकुमार शिंदे भा.वि. इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका पूनम गुरुनाथ सोनटकले (पैकेकरी), यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी गुणवंत शिक्षकांपैकी प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण व अश्विनी मोरे-वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्तकरताना डॉ. नभा काकडे म्हणाल्या की, विश्वासाला पत्र असल्यामुळेच शिक्षकाचा शासनाकडून, जनगणना, निवडणुकीच्या कामात, एस.आय. आर सर्वेक्षण, साथरोग नियंत्रणात सहभाग घेतला जातो. शिक्षकांनी विचार स्वातंत्र्यावर भर दिल्यास विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता दूर होऊ शकेल. सुरुवातीला मान्यवरांचा परिचय प्रा. सोनाली पाटील यांनी केला तर गुणवंत शिक्षकांचा परिचय डॉ. आयेशा रंगरेज व डॉ. विजया महाजन यांनी केला. मान्यवरांचे स्वागत डॉ. गौरी कहाते यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अमृता निंबार्गीकर यांनी केले तर आभार सपना चिट्टे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कनाशी बाजारात बैलपोळ्याची धूम! बळीराजाच्या साजासाठी हजारोंची गर्दी

कनाशी (स. गांवकरी) : शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सण बैलपोळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, त्यासाठी लागणाऱ्या साज-सामानाच्या खरेदीसाठी आज कनाशीचा आठवडे बाजार अक्षरशः गजबजून गेला होता. कळवण तालुक्यातील नाशिक हद्दीतील हा बाजार बैलपोळ्याच्या साहित्यासाठी प्रसिद्ध असून, येथे खरेदीसाठी शेतकऱ्यांनी अक्षरशः झुंबड केली होती. बळीराजा हा शेतकऱ्याचा खरा सोबती. वर्षातून एकदा येणारा हा सण शेतकरी मोठ्या उत्साहात साजरा करतो. बैलांना नटवून-थटवून त्यांची गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढली जाते. त्यामुळे बैलांसाठी रंगीबेरंगी झूल, शिंगांना लावायचे शिंगाडे, कपाळपट्टी, घुंगरांच्या माळा, कवड्यांच्या माळा, पायातले चाळ, नवी वेसण, दोऱ्या खरेदीसाठी बाजारपेठ सज्ज झाली होती. कनाशी हे असे बाजारपेठ आहे की, जिथे कुठेही न मिळणारा साज हमखास मिळतो. त्यामुळे दूरदूरच्या खेड्यापाड्यातून शेतकरी कुटुंबासह, महिलांसह खरेदीसाठी दाखल झाले होते. सकाळपासूनच दुकानांसमोर शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी पाहायला मिळत होत्या. विक्रेत्यांनी देखील साहित्याचे ढीग रचले होते. कनाशीसारखा साज कुठेच मिळत नाही, म्हणून आम्ही दरवर्षी इथेच येतो अशी प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली.

### माऊली ग्रुप गोविंदांनी फोडली शिवजन्मभूमीची दहीहंडी



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : शिवजन्मभूमी प्रतिष्ठान जुन्नर वर्ष पाचवे दरवर्षी सालाबाद प्रमाणे मोठ्या उत्साहात व दिमाखात श्री छत्रपतीशिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या समोर दहीहंडी उत्सव साजरा केला जातो यावर्षी एकूण चार गोविंदा पथकांनी भाग घेतला होता त्यामध्ये माऊली ग्रुप गोविंदा पथक अवसरी यांना दहीहंडी फोडण्याचा मान मिळाला बक्षीस स्वरूपात त्यांना मानाची ट्रॉफी रोख एक लाख अकरा हजार रुपये व सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला सामाजिक बांधिलकी म्हणून शहरामध्ये किल्ले बनवणे स्पर्धा रांगोळी स्पर्धा मोफत वह्यावाटप किल्ले शिवनेरीच्या जवळपासच्या परिसरात कचरा टाकण्यासाठी डस्टबिन चे डबे व असे इतर सामाजिक कार्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी करत असतो त्यालाच अनुसरून यावर्षी जे जुन्नर शहरांमध्ये गेले कित्येक वर्ष शहराच्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी चाळीस ते पन्नास वर्षे झाले घेणारे वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रा मध्ये आपले नाव मोठ्या उंचीवर नेणारे असे डॉ.सुनिल शेवाळे डॉ. सी जी कुलकर्णी , डॉ.पी आर कुलकर्णी,डॉ. सतिश निरगुडकर,डॉ. शिवराजन लवाटे,जुन्नर पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड मंडळाचे आधार स्तंभ सत्यवान बाळसराफ , कोंडाजी बाबा डेअरी आश्रम मधील ह.भ.प देवदत्त ताजणे महाराज अशा मान्यवरांचा प्रतिष्ठानच्यावतीने सत्कार करण्यात आला दरवर्षीप्रमाणे गोविंदा पथकातील गोविंदाची काळजी घेण्यासाठी रेस्क्यू टीमच्या वतीने सर्व नियोजन करण्यात येते यावेळी विशेष आकर्षण म्हणून नऊ फुटाचा भव्य गोरिला आणण्यात आलेला होता त्यामुळे बालगोपालांना त्याचा भरपूर उत्साहात आनंद घेण्यात आला त्यावेळी प्रतिष्ठान मधील सर्व सभासद देणगीदार उपस्थित होते त्यामध्ये संस्थापक अध्यक्ष रवी भाऊ खिल्लारी प्रथम भाजप जुन्नर पंचायत समिती सदस्य संजय भाऊ वराडी यावर्षीचे उत्सवाचे अध्यक्ष रुपेश जगताप उपाध्यक्ष डॉक्टर स्वानंद देशपांडे कार्याध्यक्ष निलेश चतुर सचिव प्रशांत देवणे सर सहसचिव संजय चिखले खजिनदार सचिन कदम जुन्नर नगर परिषदेचे नगरसेवक अनिल रोकडे ,सामाजिक कार्यकर्ते सुरज भाऊ वाजगे, प्रसिद्ध उद्योजक चंद्रकांत भाऊ काजळे हे सर्व उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख ओंकार जोशी यांनी केले.

### अकोले तालुक्यातील पहिले सर्जन डॉ. विजय पोपेरे यांचे निधन!



अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील पहिले एमबीबीएस व एमएस (जनरल सर्जन) असलेले डॉ. विजय विठ्ठलराव पोपेरे (वय ५९) यांचे मुंबई येथील जसलोक रुग्णालयात उपचार सुरू असताना बुधवारी सायंकाळी पाच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अकोले तालुक्यात वैद्यकीय क्षेत्रासह सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे. डॉ. विजय पोपेरे यांच्या पार्थिवावर गुरुवारी अकोले येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. ते जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व सेवानिवृत्त मुख्याध्यापक स्व. विठ्ठलराव पोपेरे यांचे चिरंजीव होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, दोन भाऊ व एक बहीण असा परिवार आहे. अकोले ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा पोपेरे यांचे ते पती, तर डॉ. साक्षी पोपेरे यांचे वडील होते.

# प्रवेशद्वाराचे भव्य उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

मेहेंदुरी, ता. अकोले : (स. गांवकरी)



मेहेंदुरी, ता. अकोले : येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे तसेच कै. देवराम पुंजा आरोटे यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराचे भव्य उद्घाटन शनिवारी, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार वैभवराव पिचड होते. बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे तसेच मा. आमदार सुधीर तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे यांना त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त मान्यवर व उपस्थित नागरिकांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी शालेय विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात मान्यवरांचे उत्स्फूर्त आणि भव्य स्वागत केले. कै. देवराम पुंजा आरोटे यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वारासाठी विकास देवराम आरोटे, चंद्रभागा देवराम आरोटे तसेच त्यांच्या परिवारातील मुले, मुली, जावई आणि नातवंडांनी विशेष योगदान दिले.

माजी विद्यार्थी, मेहेंदुरी तसेच बहिरवाडी, पलाटवाडी, म्हाळादेवी, उंचखडक, रूंभोडी आणि इंदोरी येथील ग्रामस्थ तसेच विद्यालयातील आजी-माजी शिक्षक यांच्या लोकसहभागातून श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाची उभारणी करण्यात आली आहे.

उद्घाटन सोहळ्यानिमित्त उद्योजक सुरेशराव कोते व रमेश अण्णा जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कवयित्री मंदाकिनी हांडे यांनी जिजाऊ वंदना सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. शिवव्याख्याती कु. वेदिका भूषण बंगाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रभावी व सुश्राव्य व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास बंगाळ यांनी केले, तर माधवराव बंगाळ यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. शिवस्मारक उभारणीसाठी देणगी देणाऱ्या दानशूर व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच मातोश्री चंद्रभागा देवराम आरोटे यांचा विशेष सत्कार पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, आनंदराव नवले, विनोद हांडे, भास्कर घुले, कल्पनाताई सुरपुरीया, मधुकरराव सोनवणे, सुधाकर आरोटे, राधाकिसन म्हस्के, संदीप मालुंजकर, सुरेश गडाख, सुशांत गजे, स्वप्नील चासकर, नितीन बंगाळ, रामकृष्णहरी बंगाळ, नंदकुमार मुंढे, लक्ष्मण आभाळे, शिवाजी आरोटे, सुनील पंडित, एस. पी. मालुंजकर सर, दिलीप थोरे, सदानंद बंगाळ, अनिता बंगाळ मॅडम, भाऊसाहेब येवले, माजी मुख्याध्यापक बनकर सर, भूषण आरोटे, भाऊसाहेब वावळे, निशांत चासकर, साहेबराव आरोटे, तुकाराम मेंगाळ, अशोक संगारे, शांताराम संगारे, भारती चासकर, जादूगार पी. बी. हांडे, सतीश आरोटे, रवींद्र कोल्हाळ, बबन शिंदे, संजय फरगडे, सागर आरोटे, शांताराम मालुंजकर सर, रोहिदास पवार, नितीन सूर्यवंशी, मधुकर शेटे, अनिल चासकर, शंकर संगारे, बाळासाहेब आरोटे, पोपटराव कुसळकर, राहुल आरोटे, पांडुरंग लगड, अण्णासाहेब मालुंजकर, हनुमंत चासकर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका मनाली आंबरे व सुनीता गुंजाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक नवले, शरद हांडे, अमोल कासार, गणेश कासार, श्रीमती बोडके, संचिता मोहटे, कासार, पंढरी आरोटे व बेबीताई आरोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती सोनवणे यांनी केले.

## संत महंतांच्या उपस्थितीत दहीहंडीचे पूजन

नेवासा : (स. गांवकरी)

■ गोविंदा गोविंदा च्या निनादाने नेवासेनगरी दुमदुमली

नेवासा येथील एस टी स्टॅण्ड कॉर्नरवर श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव समितीच्या वतीने आयोजित दहीहंडी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराजांनी दहीहंडी सोहळयाला शुभेच्छा संदेश पाठवला तर संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून प्रातिनिधिक स्वरूपात लावलेली दहीहंडी फोडण्यात आली.या सोहळयाला आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांची विशेष उपस्थिती होती.गोविंदा गोविंदा च्या निनादाने नेवासेनगरी दुमदुमली होती. यावेळी झालेल्या दहीहंडी कार्यक्रम प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,भागवताचार्य अंकुश महाराज जगताप,शिवसेना नेते व पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख प्रभाकरकाका शिंदे पाटील,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सतीश मुळे सर,नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील,विश्व हिंदु परिषदेचे पदाधिकारी व हृदयरोग तज्ञ डॉ.अविनाश काळे,सतीश कर्डीले,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापदादा चिंधे,विश्व हिंदू परिषदेचे प्रशांत बहिरट,नगरसेवक प्रविण सरोदे,नगरसेवक महेश लोखंडे,नगरसेवक अंकुश म्हस्के, संदीप सरकाळे,अनिल पवार,नानासाहेब शेंडे,शिवसेनेचे पप्पू परदेशी,बंडू शिंदे,व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी झालेल्या दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजक श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव समितीचे अध्यक्ष कृष्णाभाऊ परदेशी यांनी आलेल्या संत महंतांचे व उपस्थित गोविंदाचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

## संथारा व्रताने समाधिमरण!



अकोले : (स. गांवकरी)

अकोले येथील बांधकाम क्षेत्रातील साहित्य विक्रीचे व्यापारी प्रकाश जेठमल लोढा (वय ७५) यांनी गुरुवारी, दि. ३ सप्टेंबर रोजी सल्लेखनापूर्वक संथारा व्रत धारण करून समाधिमरण स्वीकारले. संयम, श्रद्धा आणि आत्मसाधनेच्या भावनेतून त्यांनी देहाचा त्याग करून आत्मकल्याणाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या या साधनेबद्दल जैन समाजातून आदर व श्रद्धेची भावना व्यक्त करण्यात आली. प्रकाश लोढा हे अकोले शहरातील बांधकाम साहित्य विक्री व्यवसायातील परिचित व्यापारी होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक तसेच जैन समाजात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सार्थक, भाऊ सुरेश, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

## घाटघर जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता

अकोले : (स. गांवकरी)

**आंदोलनानंतर एका शिक्षकाची नियुक्ती!**



अकोले तालुक्यातील अतिदुर्गम घाटघर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने संतप्त पालकांनी शाळेच्या आवारात ठिय्या आंदोलन केले. पहिली ते आठवीपर्यंत वर्ग असलेल्या या शाळेत मुख्याध्यापकांसह केवळ पाच शिक्षक कार्यरत होते. आवश्यक शिक्षकसंख्या आठ असताना एका शिक्षकावर तीन-तीन वर्गांची जबाबदारी पडल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचा आरोप पालकांनी केला. आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने तातडीने एका शिक्षकाची नियुक्ती केली आहे.

दरम्यान, "कागदावर नियुक्ती, प्रत्यक्षात शिक्षक कुठे?" असा सवाल सामाजिक कार्यकर्ते देवीदास खडके यांनी उपस्थित केला. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून दुर्गम भागातील शाळांवर शिक्षकांच्या नियुक्त्या होतात; मात्र वैद्यकीय कारणे किंवा दुर्गम भागाचे कारण देत काही शिक्षक बदली करून घेत असल्याने प्रत्यक्ष शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम राहत असल्याचा आरोप त्यांनी केला. घाटघर शाळेत सुमारे १५६ आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असून, प्रत्येक वर्गाला पूर्णवेळ शिक्षक मिळणे आवश्यक असल्याची मागणी पालकांनी केली आहे.

"पोटाला चिमटा काढून मुलांना शाळेत पाठवतो; मात्र शिकवायलाच शिक्षक नसतील तर हा मुलांच्या भविष्याशी खेळ आहे," अशी संतप्त भावना पालकांनी व्यक्त केली. उर्वरित रिक्त पदे पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, 'महाराष्ट्राची चेरापुंजी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अतिदुर्गम घाटघरमध्ये नियुक्त शिक्षक प्रत्यक्ष रुजू होणार का, हा प्रश्न कायम आहे. दरम्यान, यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या वृत्तात आश्रमशाळेचा उल्लेख झाला होता; मात्र या प्रकरणाचा घाटघर शासकीय आदिवासी आश्रमशाळेशी संबंध नसून तेथील शिक्षक नियमित अध्यापन करत असल्याचे मुख्याध्यापक अभय वाघ यांनी स्पष्ट केले.

## सत्यभामा शिंदे यांचे निधन!

अकोले : (स. गांवकरी)



शहरातील जुन्या पिढीतील ख्यातनाम अगस्ति मुद्रणालयाचे मालक कै. मधुकरराव पिराजी शिंदे यांच्या पत्नी सत्यभामा मधुकरराव शिंदे (वय ८३) यांचे शुक्रवारी, दि. ४ सप्टेंबर रोजी नाशिक येथे मुलगा रवींद्र मधुकरराव शिंदे यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने शिंदे कुटुंबीय, नातेवाईक व परिचितांमध्ये शोककळा पसरली. सत्यभामा शिंदे यांच्या पश्चात दोन मुले रवींद्र शिंदे व विवेक शिंदे, सुना, बहीण, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या नाशिकस्थित रवींद्र शिंदे तसेच अगस्ति मुद्रणालयाचे संचालक विवेक शिंदे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी, दि. ५ सप्टेंबर रोजी अकोले येथील सिद्धेश्वर मंदिराजवळील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## AI क्रेडिट स्कोअरपासून हरित अग्निशमनापर्यंत

**महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषकांची राष्ट्रीय भरारी**

मुंबई : (स. गांवकरी)

कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरण संरक्षण आणि सर्क्युलर इकॉनॉमीच्या माध्यमातून सामाजिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधणाऱ्या महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषकांनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. Samsung Solve for Tomorrow या नवोन्मेष कार्यक्रमाच्या पाचव्या आवृत्तीतील राष्ट्रीय Top 40 मध्ये महाराष्ट्रातील तीन युवा नवोन्मेषकांची निवड झाली आहे. मुंबई आणि पुण्यातील या नवोन्मेषकांकडून 'AI Living for India' आणि 'Environmental Sustainability' या दोन थीम्सअंतर्गत विविध समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित केले जात आहेत. लघु व्यवसायांना आर्थिक सुविधांचा प्रवेश, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक अग्निशमन, तसेच कापड कचऱ्याचे व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये त्यांचे प्रकल्प केंद्रित आहेत. मुंबईतील १६ वर्षीय Shrihan Jha हे लघु व्यवसायांसाठी आर्थिक व्यवस्था अधिक सुलभ करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत. हस्तलिखित बिले आणि UPI व्यवहारांचे विश्लेषण करून क्रेडिट स्कोअर तयार करणारे ॲप ते विकसित करत आहेत. या ॲपला AI-आधारित आर्थिक चॅटबॉटची जोड देण्यात आली आहे. लघु व्यवसायांना औपचारिक आर्थिक प्रोफाइल तयार करण्यास आणि भविष्यात कर्जासारख्या आर्थिक सुविधांपर्यंत पोहोच सुधारण्यास मदत करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. पुण्यातील १७ वर्षीय Palaash Gang यांनी अग्निशमन अधिक पर्यावरणपूरक करण्याच्या दिशेने अभिनव प्रयोग केला आहे.

## हरिकीर्तनाचे आयोजन!

लिंगदेव : (स. गांवकरी)

भगवान श्री लिंगेश्वर महादेव यांच्या पावन सान्निध्यात चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त महाराष्ट्रातील सुविख्यात कीर्तनकार गाथामूर्ती ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांच्या सुश्राव्य हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्री लिंगेश्वर महादेव सभामंडप, लिंगदेव येथे हा धार्मिक कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी भजनानंद व ज्ञानामृत श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कीर्तनानंतर भाविकांसाठी फराळाचा प्रसाद उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समस्त ग्रामस्थ मंडळी लिंगदेव तसेच श्री लिंगेश्वर महादेव व मारुती देवस्थान ट्रस्ट, लिंगदेव यांच्या वतीने सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे विनम्र आवाहन करण्यात आले आहे.

## ज्यांच्या हाती शून्य होते, त्यांनीच जगाला मार्गदर्शन केले : डॉ. सुनील शिंदे

अकोले : (स. गांवकरी)

■ भारतरत्न राजीव गांधी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा!

सेवाभावाचा खरा धर्म घरातून शिकायला मिळतो, तर शालेय जीवनात सेवावृत्तीचे संस्कार घडतात. ज्यांच्या हाती शून्य होते, त्यांनीच जगाला मार्गदर्शन केले आणि समाजासोबत स्वतःचेही आयुष्य घडविले, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. सुनील शिंदे यांनी केले. धामणगाव आवारी येथील अताए सोसायटी संचलित भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. डॉ. शिंदे म्हणाले की, थोरामोठ्यांच्या त्याग व समर्पणातून समाजव्यवस्था घडते. साने गुरुजींच्या 'श्यामच्या आई' मधून सेवाधर्माची साध्या-सोप्या भाषेत शिकवण मिळते. निसर्ग, पक्षी आणि मुक्या प्राण्यांकडूनही माणसाला अनेक चांगले गुण शिकता येतात. जगात कुणालाही कमी लेखू नये किंवा कुणाचा अपमान करू नये. प्रसंगी रस्त्यावरचा दीनदुबळा माणूसही अनुभवातून मोठे शहाणपण शिकवून जातो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष व अताए सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य शरद देशमुख होते. त्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करताना विद्यार्थ्यांनी शिक्षक तसेच मातापित्यांचा सदैव आदर करावा, असा संदेश दिला. यावेळी निवृत्त शिक्षणाधिकारी सुरेश आवारी यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका मंगल कर्पे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्राचार्य बाळासाहेब पारखे यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक' पुरस्कार प्रदान

जामखेड : (स. गांवकरी)



ज्ञानदानाची तळमळ, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता, संस्कारक्षम शिक्षणाची कास आणि योगविद्येच्या माध्यमातून समाजाच्या आरोग्यासाठी सुरू असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब आप्पा पारखे यांना जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली आणि कै. सुवालाल भगवानदास कोठारी सामाजिक प्रतिष्ठान, जामखेड यांच्या वतीने २०२६ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामखेड येथील प्रसिद्ध उद्योगपती कांतीलाल कोठारी होते. प्रमुख अतिथी म्हणून दि. पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्धवराव देशमुख, संस्थेचे सचिव अरुणशेठ चिंतामणी, जामखेड नगर परिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. प्रांजल अमित चिंतामणी, जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, जयश्री देशमुख, संचालक दीपक होशिंग, डॉ. प्रताप गायकवाड, माजी प्राचार्य अनंता खेत्रे, रमेश अडसूळ, दत्तात्रय काळे, शहाजी वायकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज शिंदे, सनराईज मेडिकल अँड एज्युकेशन संस्थेचे संचालक डॉ. संजय भोरे, समर्थ हॉस्पिटलचे संचालक डॉ. भरत दारकुंडे, शिवनेरी अकॅडमीचे संचालक कॅप्टन लक्ष्मण भोरे, पत्रकार संतराम सूळ, अशोक निमोणक, नासीर पठाण, मिठुलाल नवलाखा, संजय वारभोग, मनोज कुलथे ,रोहिदास केकाण, वैभव कटारिया, दीपक भोरे, डॉ. कासम शेख, डॉ. गोरख गायकवाड, सौ. सुरेखा देसरडा, सौ सुनंदा लुंकड, प्राची लुंकड यांच्यासह ल. ना होशिंग विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते. पारखे सरांच्या कार्याचे कौतुक करताना त्यांच्या ज्ञानदानाच्या तळमळीचा विशेष उल्लेख केला. ल. ना. होशिंग विद्यालयाची शैक्षणिक परंपरा पुढे नेण्यात पारखे सरांचे योगदान महत्त्वाचे असून, ते विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची तोफ असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून आदर्श शिक्षक पुरस्कार मिळणे ही अभिमानाची बाब असल्याचे चौधरी यांनी नमूद केले. नगराध्यक्षा प्रांजलताई चिंतामणी यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार ही अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगितले. पारखे सरांनी विद्यार्थ्यांमध्ये रुजवलेले संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडतील. त्यांच्या कार्यामुळे ल. ना. होशिंग विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याचे त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य बाळासाहेब पारखे यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. १९९२ पासून आपण शिक्षण क्षेत्रात सेवा करत असून संस्थेकडून नेहमीच आदर्श कार्य करण्याची प्रेरणा मिळत आली, असे त्यांनी सांगितले.जामखेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी योगविद्येचे धडे गिरवत असून, योगाच्या माध्यमातून समाजाच्या आरोग्यासाठी योगदान देण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आजपर्यंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या कार्यात कधीही शिळा नैवेद्य दाखवला नाही. हा पुरस्कार माझा नसून संस्था आणि माझ्या विद्यार्थ्यांचा आहे," अशी भावनिक भावना पारखे सरांनी व्यक्त केली.

यावेळी कै. सुवालाल भगवानदास कोठारी सामाजिक प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचेही मान्यवरांनी कौतुक केले. कोरोना काळात तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये प्रतिष्ठानने केलेल्या मदतीमुळे परिसरात संजय कोठारी यांची 'देवदूत' म्हणून ओळख निर्माण झाली असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रतिष्ठानच्या माध्यमातून देहदानासारख्या सामाजिक संकल्पना राबविल्या जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी मनोगत व्यक्त करताना, "ज्या शाळेत मी शिक्षण घेतले, त्याच शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे," अशी भावना व्यक्त केली.

आई-वडिलांनंतर गुरू हे विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणारे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. स्मृतीचिन्हाचे वाचन पर्यवेक्षक सुदाम वराट यांनी केले सुत्रसंचलन निलेश दिवटे तर मुकुंद राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.